
# श्री साईलीला




प्रसादाची हंडी

सेंबर

६० पैसे

१९७३

# अनुक्रमणिका-डिसेंबर १९७३


| | | |
|---|---|---|
| १. | संपादकीय–आनंदात रहा | |
| २. | मी साईभक्त कसा झालो | डॉ. के भ. गव्हाणकर |
| ३. | निस्संग राधा<br>इथें उभी मी ! | श्री. श्री. तु. नाईक |
| ४. | साईनाथ ललित चरित्र | श्री. र. श्री. पुजारी |
| ५. | संगम | श्री. शशिकांत पाळंदे |
| ६. | श्रीगोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन | श्री. पु. मु. अत्रे |
| ७. | रामगीतांजलि–(८) | श्री. दि. अ. घैसास |
| ८. | श्रीसोनाजी महाराज | श्री. श्री. ना. हुद्दार |
| ९. | अनंतता | श्री. चिपळूणकर गुरुजी |
| १०. | प्रेमवेडी राधा<br>तुळशी वृंदावन | श्री. रमेश चव्हाण |
| ११. | स्वामी रामतीर्थ | श्री. दि. अ. घैसास |
| १२. | साईगीतमाला (पुष्प ४ थे) | श्री. मधुकर जोशी |
| १३. | शिरडीवृत्त (सप्टेंबर व ऑक्टोबर १९७३) | |
| १४. | श्रीसाईकृपेचा एक अनुभव | श्री. चन्द्रकांत सामंत |
| १५. | गुरुनानक | श्री. "चेतन" |
| १६. | मी साईभक्त कसा झालो | श्री. डी. बी. पोतनीस |
| १७. | चंद्रभागेच्या तिरीं | श्री. गुणवन्त तावरे |
| १८. | नाशवन्त देहावर | सौ. मालती जोशी |
| १९. | मी साईभक्त कसा झालो | श्री. अनिल पंडित |



# श्री साई वाक्सुधा

**जगा लावावें सत्पथीं। हेचि साईलीलेची कृती ॥**

धन्य धन्य तयांची प्रेमळता। खळचांत परसांत कामें करितां।
दळितां कांडितां डेरे घुसळितां। महिमा गातात बाबांचा ॥७६॥
आसनीं भोजनीं शयनीं। बाबांच्या नांवाची अक्षय स्मरणी।
एक बाबांविण दुजा कोणी। देव ज्यांनी नाठविला ॥७७॥
काय त्या बायांचे प्रेम तरी। काय तयांचे प्रेमाची माधुरी।
निर्मळ प्रेमचि कवन करी। विद्वत्ता न करी कवनास ॥७८॥
साधी सरळ भाषा खरी। विद्या नाही तिळभरी
त्यांतूनि जे कवित्व चमक मारी। मान चतुरीं डोलविजे ॥७९॥
खऱ्या प्रेमाचें आविर्भवन। तया नांव खरें कवन।
तें या बायांच्या वाणीमधून। श्रोतीं पाहून घ्यावें कीं ॥८०॥

साई सच्चरित अध्याय १० वा

---


# श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] डिसेंबर १९७३ [ अंक ८

: संपादक :

**श्री. का. सी. पाठक**

वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर मुंबई, १४.
पिन: ४०००१४ टे. नं. ४४३३६१



# श्री साई वाक्सुधा

**जगा लावावें सत्पथीं । हेचि साईलीलेची कृती ॥**

धन्य धन्य तयांची प्रेमळता । खळचांत परसांत कामें करितां ।
दळितां कांडितां डेरे घुसळितां । महिमा गातात बाबांचा ॥७६॥
आसनीं भोजनीं शयनीं । बाबांच्या नांवाची अक्षय स्मरणी ।
एक बाबांविण दुजा कोणी । देव ज्यांनी नाठविला ॥७७॥
काय त्या बायांचे प्रेम तरी । काय तयांचे प्रेमाची माधुरी ।
निर्मळ प्रेमचि कवन करी । विद्वत्ता न करी कवनास ॥७८॥
साधी सरळ भाषा खरी । विद्या नाही तिळभरी
त्यांतूनि जे कवित्व चमक मारी । मान चतुरीं डोलविजे ॥७९॥
खऱ्या प्रेमाचें आविर्भवन । तया नांव खरें कवन ।
तें या बायांच्या वाणीमधून । श्रोतीं पाहून घ्यावें कीं ॥८० ॥

साई सच्चरित अध्याय १० वा

---


## श्रीसाईलीला

[ शिरडी संस्थानचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५२ वे ] डिसेंबर १९७३ [ अंक ८

: संपादक :

**श्री. का. सी. पाठक**

वार्षिक वर्गणी रु. ६—०० (ट. ख. सह)



: कार्यालय :

साईनिकेतन, प्लॉट नं. ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर मुंबई, १४.
पिन: ४०००१४ टे. नं. ४४३३६१

संपादकीय

# आनंदात रहा

आपल्या जीवनात सुखदु:खाचे अनेक प्रसंग येतात. सामन्यत: दु:ख प्राप्त झाले की आपण देवाचा धावा करतो. सुखाच्या वेळी आपण सुखप्रद विषयातच गुंतून पडतो. परंतु सुख आणि दु:ख यांमुळे दोलायमान न होण्याची कला ज्याना साधते ते त्या पलीकडील आनंदमय अवस्थेत रहातात. बाह्य परिस्थितीचे फटके नि चटके कुणाला बसत नाहीत? प्रतिक्रिया मात्र आपल्या मनावर अवलंबून असते. सर्वत्र समबुद्धि असणारे संत आपल्याला ही प्रतिक्रिया कशी असावी तेच सांगतात. नम्रता आणि आनंद यांचा सदोदित सहकार असतो. 'नम्र झाला भूतां। तेणें कोंडिलें अनंता।।' या तुकारामबुवांच्या उक्तीप्रमाणें नम्रतेतच अनंतपणाचे सार साठविलेले असते. आपला उतावीळपणा, सुखलोलुपता, गर्विष्ठपणा, क्रोधाला वश होण्याची प्रवृत्ति, त्याचप्रमाणें संकुचितपणा, तात्कालिक स्वार्थाला कवटाळून बसण्याची आपली पराकाष्ठा यांचा परिणाम म्हणजे आपला आनंद हरवून बसणें होय. श्रीसाईबाबांनी सबूरीचा सल्ला दिला तो किती यथार्थ आहे पहा! तितिक्षा, सहनशीलता, धैर्य, शांति, क्षमाशीलता, 'पेशन्स', अशा नाना छटांनी या सबूरीचा आविर्भाव होत असतो. साधनांतील पहिलें साधन जो विवेक त्यांतही 'धीर धरणें' आलेच. विपत्तीत धैर्य हा मित्र असतो, पण संपत्तींतही धैर्य सोडून चालत नाहीं. धैर्याची, सबूरीची, समजूत पाडून घेताना आपण आपल्या मूळच्या आत्मानंदाची सदा स्मृति ठेवली पाहिजे. आपण मूळ स्वस्वरूपातील आनंद हरवतो, विसरतो व तो अन्यत्र प्राप्तव्य विषयात शोधीत बसतो. पण जो ही आनंदमयता विसरत नाही त्याला कशाचेच भय नसते. निर्भयतेशिवाय आनंदाला जीवनात पाऊलच टाकता येत नाही. या सर्व सद्‌गुणांचा मुख्य मेरुमणी म्हणजे आनन्द होय. समाधान, संतोष इत्यादि वृत्तींनी आपल्या आंतरिक आनंदाची अभिव्यक्ति होत असते. या आनंदाला तडा जाऊं न देणे हेच आत्मानुसंधान होय. हीच विषयांपासून निवृत्ति होय. परमेश्वर आनंदमय आहे; त्याचे जीवभूत सनातन अंश जे आपण, तेही आनंदमयच आहोत; मूलत: सर्वत्र आनन्दच भरून राहिला आहे. तो पहायला, चाखायला, संतांनी सदुक्तिरूप अमृतपात्रे वाढून ठेवली आहेत. आपण तसेच आपल्या भोवतींचे लोक यांत आनंदाचाच प्रभाव पडूं द्या.

# श्री साईलीला

मासिक महिन्याच्या पहिल्या तारखेला प्रसिद्ध होते.

या मासिकात प्रसिद्ध होणाऱ्या लेखांतील मतांची जबाबदारी त्या त्या लेखकांची राहील.

मासिकाकडे प्रसिद्धीसाठी पाठवावयाचे साहित्य सुवाच्य अक्षरात कागदाच्या एकाच बाजूवर लिहिलेले असावे.

साहित्याची स्वीकृति किंवा अस्वीकृति लेखकांना वा कवींना व्यक्तिगत पत्रानें कळविणें, त्यांना आवश्यक वाटल्यास त्यासाठी २० पैशांची तिकिटें साहित्याबरोबर पाठवावीत. ज्या अंकांत साहित्य प्रसिद्ध झालेले असेल तो अंक संबंधित लेखकांकडे बुकपोस्टाने पाठविला जाईल.

वार्षिक वर्गणी ६ रु. पाठवितांना आपल्याला मासिक इंग्रजी पाहिजे कीं मराठी याचा स्पष्ट उल्लेख आवश्यक आहे. तसा नसल्यास मराठीच अंक पाठविला जाईल.

सर्व अंक बुकपोस्टाने यादीप्रमाणे १ तारखेच्या सुमारास पोस्टांत टाकले जातात. त्यानुसार ५ तारखेपर्यंत तरी अंक सर्वांना मिळावे. अंक पोस्टांत गहाळ होतात व वाचकांना मिळत नाहीत अशा तक्रारी येतात, पण संस्थान या बाबतींत काही करूं शकत नाही. आपला अंक खात्रीशीर हवा असल्यास रजिस्टर्ड ए. डी. चे १ वर्षाचे पैसे आगाऊ आमच्याकडे भरावे म्हणजे अंक रजिस्टर्ड करून पाठवूं.

नमुना अंक मोफत पाठविणें शक्य नाही. तो ८५ पैशांची तिकिटें पाठवून मागवावा. मागील महिन्यांचे अंक सामान्यत: शिल्लक नसतात. तरी त्याबद्दल पत्रव्यवहार करूं नये. लेखकांनीं आपल्या लेखांच्या वा कवितांच्या वर उजव्या बाजूस आपले पूर्ण नांव व पूर्ण पत्ता लिहिणे आवश्यक आहे. लेखाची स्थळप्रत त्यांनी न चुकतां आपल्याजवळ ठेवावी. साहित्याचे संपादन करतांना त्यांतील आक्षेपार्ह वाटणारा मजकूर काढून टाकणें, किंवा भाषा सुधारून घेणें, वगैरे बाबतींत संपादक व त्यांनी नेमलेले तज्ञ यांना पूर्ण व अंतिम अधिकार राहतील. लेख किंवा कविता स्वीकृत किंवा अस्वीकृत करण्याचाही पूर्ण अधिकार त्यांना राहील.

या मासिकाच्या बाबतीत सर्व पत्रव्यवहार मुंबई कार्यालयाशींच करावा. शिरडी कार्यालयाकडे करूं नये.

# मी साईभक्त कसा झालो ?

डॉ. के. भ. गव्हाणकर, कुर्ला-७०

ते साल १९१८, आणि महिना जानेवारी. मी त्यावेळीं मराठी पांचवीत होतो, आणि उपनयन झाल्यामुळे शेंडी होती. अंगांत बंद कोट, वेलबुट्टीची टोपी आणि तुमान, अशा थाटांत मी माझे काका कै. रामचंद्र बळवंत यांचे बरोबर शिरडीस गेलो. त्यावेळी वाहनाची सोय नव्हती त्यांतच कडक थंडी! कोपरगांव स्टेशनपासून ११ मैल टांग्यातून गेलो, व टांग्यांतून उतरल्याबरोबर सकाळीं सुमारे ८-९ वाजतां आम्ही सर्व मशीदमाईच्या मंडपांत दाखल झालों; व तेथे द्वारकामाईच्या पायऱ्या चढून वर गेलों; तोंच बाबांनी माझा हात धरला व आपल्याकडे ओढले व 'माझे पेढे दे' असे मागणे केले. "नित्यरूपांत जो एकच एक आहे तोच लीलेमध्यें अनेकवत् भासतो" असा दिव्य, भव्य, अजानबाहू, ज्याच्या डोकीस शुभ्र फडका, गोरीगोरी-गुलाबी छटामिश्रीत मुद्रा व सुबक दाढी मिशी, हंसरा, आनंदी उंच पायघोळ कफनी परीधान केलेला पुरुष पाहून कवी मधुकर जोशींच्या शब्दांत 'आनंद काय सांगू! सांगू ग कसा बाई' मी गुंग झालो आणि स्वतःलाच विसरलो, तोंच काकांनी ५ शेर पेढयांची करंडी माझ्या हातीं दिली. बाबांना पेढे दिल्यावर माझ्या हातांत अवघे ५ पेढे ठेवून बाबा आपणच आधाशासारखे खात सुटले व १ शेर पेढयांचा फन्ना उडवला. हे पाहून कै. माधवराव देशशपांडे (शामा) यांनी बाबांना विचारलें 'अरे देवा ! हे त्वां काय केलेस?' बाबा म्हणाले, 'अरे शामा ! ह्या पोरांनी मला ५ वर्षें उपाशीं ठेवलंय कीं'!

माझा जन्म वैशाख शु. ५ मी २३ मे १९०६ परंतु १९१२ साली माझ्या बाबांच्या कृपेने पुनर्जन्म झाला. मी सीक होतो, व Eupyeiua छातींत पू झाला, १०४ डी. ताप उतरत नसे व शुद्ध गेली होती. नामांकीत डॉक्टर महाशयांनी, त्यावेळचे. डॉ. भडकमकर. एम्. ए. एम्. डी, डॉ. राव-पॅथॉलॉजीस्ट यांनी ऑपरेशन करण्याचा सल्ला दिला, पण काका कै. विठ्ठल बळवंत व वडील भगवंत बळवंत त्याला तयार झाले नाहीत, जवळ जवळ तीन महिने होत आले, सर्वांनी आशा सोडली होती, पण 'देव तारी त्याला कोण मारी!' दैवांत कांही आगळेच होते. एके दिवशीं कै. ह. भ. प. यशवंतराव ज. गाळवणकर हे घरी आले व काकांना म्हणाले, " विठ्ठल, तुझा पुतण्या आतां कांहीं जगत नाही, सर्व उपाय झाले, आतां शिरडीच्या साईबाबांना सांकडे घाल;" असे म्हणून, बाबांचा फोटो, तीर्थ व उदी दिली.

काकांनी दुपारी १२ वाजतां आरती करून बाबांचे तीर्थ माझ्या तोंडांत घातले व कपाळास उदी लावून, माझ्या उशाला बाबांचा फोटो ठेवला व म्हणाले, साईबाबा! मी कांहीं आपणांस पाहिले नाही परंतु आपली ख्याती ऐकली आहे, हा

नारळ ठेवला आहे. माझा पुतण्या-मधु-बरा झाल्यावर ५ शेर पेढे घेऊन त्याला शिरडीला आपल्या दर्शनाला पाठवीन."

चमत्कार काय सांगू! मधुकर जोश्यांच्या शब्दांत—

**"चैतन्य ब्रह्मरूप—प्रगटे गोदातीरी।**
**कुणा न कळे कांहीं—मूर्ति ही अवतारी।**
**ओळखे फक्त त्यांना, नदी ही गंगामाई।**
**साईच्या कृपेने ग। सरली रोगराई॥**

त्याच रात्री, माझ्या आतेच्या स्वप्नांत येऊन, नारळ मागितला व माझ्या अंगावरून हात फिरवून निघून गेले. आत्या खडबडून जागी झाली, व माझ्या अंगाला हात लावला तो एकदम गार लागले; त्याबरोबर मी मेलो असें समजून एकदम तिने हंबरडा फोडला व घरांत एकच गोंधळ माजला. डॉ. दिनकरराव गाळवणकर हे माडीवर झोंपले होते, ते हा गलबला ऐकून ताबडतोब खाली आले. त्यानी माझी नाडी धरली थर्मामीटर लावले तो सर्व कांही सुरळीत आहे असें आढळून आले. व म्हणाले " अरे विठ्ठल, भगवान, खुळ्यासारखे रडतां कशाला! मधु जीवंत आहे व त्याचा ताप उतरला आहे. सर्व मंडळी शांतपणे माझ्या सभोंवती बसून राहिली.

दुसरे दिवशीं सकाळी मला शुद्ध आली व माझ्या छातीच्या डाव्या बाजूला एक छिद्र पडलेले डॉ. गाळवणकर यांना आढळले व त्यानीं वळी घालून व ते दाबून आंतील पू काढून टाकला व मी बरा झालों. " त्यावेळचेच पेढे बाबांनी मागितले."

आम्ही शिरडींत ५-७ दिवस होतो. दररोज सकाळच्या बैठकीत बाबा मला आपल्या कुशींत घेऊन बसत. एके दिवशी बाबांनीं माझेकडे दोन पैसे मागितले. मी काकांकडे मागितले; त्यावर बाबा मानेने नकार देऊन 'हूं! तूं देस' असें म्हणाले. मी स्तब्ध उभा असलेला पाहून कै. माधवराव देशपांडे उठले, माझा उजवा हात घेतला व बाबांच्या हातावर ठेवून म्हणाले, " पोरा म्हण दिया " आणि मी न समजतां एकदम 'दिया' म्हटले. बाबांनीं मूठ घट्ट मिटून घेतली व 'लिया' म्हणून कफनीच्या खिशांत हात घातला.

घरी परततेवेळी आम्ही द्वारकामाईत सकाळींच सुमारे ७ वाजतां गेलों असतां बाबांनी मला खाली बसण्यास सांगितले, त्यावेळेस बाबा एका खांबाला टेकून बसले होते व पायाच्या पट्टया सोडणे चालले होते. मी खाली बसतांच माझी टोपी उडवून दिली आणि शेंडी धरून आपल्या दोन्ही पायांच्या आंगठ्यावर माझे मस्तक एकदम जोरांनी आपटले, त्याबरोबर मला १-२ सेकंद तिरीमिरी आली नंतर माझ्या पाठीवरून त्यांनी हात फिरवला व मुखांत केळें भरवले आणि पसाभर उदी दिली व म्हणाले " जाव, जाव, मैं तेरे पिच्छे हूं डरना नहीं, मै तेरा बाप हूं "! बाबांचे हे बोल-अर्थ मी लहान अवघा १२ वर्षांचा आणि अज्ञ असल्यामुळे कसें समजणार?

पुढे १९३२ साली, परत सीक झालो, त्यावेळेस सुद्धां मी १५ दिवस बेशुद्ध अवस्थेंत होतो. माझ्या रोगाचे निदान नामांकित डॉक्टरांना झाले नाहीं, व माझी आशा सर्वांनी सोडली. डॉ. तिरोडकर, डॉ. रांगणेकर, डॉ. तेलंग, डॉ. कोहियार, डॉ. बागळे नियमाने दररोज सकाळीं येऊन तपासून जात. हे सर्व बघितल्यावर माझ्या सौभाग्यवती सुशीलेने बाबांना नवस केला कीं, "बाबा हे बरे झाले म्हणजे दवाखान्यांत बसण्यापूर्वी मी यांना शिरडीला घेऊन-समाधीचे-दर्शन घेईन", चमत्कार असा कीं दुसरे दिवशीं सकाळी माझा ताप उतरला व मी शुद्धीवर आलो, सर्व नामांकित डॉक्टरांना आश्चर्याचा धक्काच बसला.

१९३२ साली मी परत शिरडीस आलो, व बाबांच्या समाधीजवळ रात्री शेजारतीनंतर बसून बाबांना सांगितले कीं, "बाबा लहानपणी आपणच मला जीवदान दिलेत व आतांसुद्धां आपणच माझे रक्षण केलेत. आणि मी आपणांस काय देतो?" मला पश्चाताप झाला व छाती भरून आली आणि म्हणालो, "बाबा हा देह आजपासून आपला व आपल्याच सेवेंत झिजावा हीच माझी प्रार्थना" असें म्हणून बाबांच्या समाधीवर घालून घेतले. त्यादिवसापासून मी शिरडीस नियमाने येत आहे.

पुढें मला स्वप्नांत, मंत्र दिला. त्याच्या दुसरे दिवशीं सकाळीच श्रीगणेशभक्त त्र्यंबक विठ्ठल सामंत-'भाऊ महाराज' कुर्ला यांचे घरी गेलो, तो त्यांनाही मला देण्याकरितां, मंत्र दिला, तो त्यांनी-संकष्टी चतुर्थीच्या दिवशी "दिला" व म्हणाले, सद्‌गुरू साईबाबा इथे आहेत त्यांचीच सेवा कर, आणि माझी श्रीसाईबाबा म्हणूनच सेवा कर. त्यांची १२ वर्षे सेवा केली, याचा परिणाम, सद्‌गुरू साईबाबाच्या पुतळ्याची प्राणप्रतिष्ठा, माझें हस्ते झाली. बाबानी शिरडी संस्थान कमिटीच्या अध्यक्षपदावर नेले, 'शिलधी' पुस्तक लिहून घेतले. श्रीसाईलीलेचे संपादकत्व देऊन आपल्या लीला लिहून, घेतल्या. व वेळ आली तसे, अध्यक्षपदाचा राजीनामा देण्यास भाग पाडले.

या विश्वब्रह्माण्डांत आत्मा हीच एकमेव सत्य वस्तु आहे. आत्मा, ब्रह्म, परमेश्वर (श्रीसाई) ही त्या सत्य वस्तूची विभिन्न नांवे आहेत. याचा साक्षात्कार बाबांनीच करवला. ऐतरेय उपनिषदांत म्हटल्याप्रमाणे आत्मा हेंच विश्वाचे आदिकारण आहे–

"आत्मा वा इदमेक एवाग्र आसीत्।" हा एकमेव द्वितीय आत्माच या विश्वाच्या रूपांत प्रकट झाला आहे, आणि आपल्या मायाशक्तीच्या साहाय्यानें तो विभिन्न नामे असलेल्या पदार्थांच्या रूपानी नटला आहे. "एकं रूपं बहुधा यःकरोति।" अर्थात् एक असूनही अनेक रूपांनी अभिव्यक्त होणे हें आत्म्याचे अचिन्त्य, अनिर्वचनीय असे ऐश्वर्य आहे, हा अनुभव येत आहे.

काय सांगू 'बाबांची लीला' १९३२ पासून आजपर्यंत कोजागरीं पौर्णिमेचा सोहळा करून घेत आहेत. आपली लीला, त्यांनी 'शिरडीचे साईबाबा', 'साईबाबा हाच चमत्कार' यांत लिहून घेतली व श्रीसाईलीलेत ते अजूनही लेख लिहून घेत आहेत.

इ. स. १९७० साली श्रावण महिन्यांत "हरिवरदा" वाचण्याचा आदेश दिला. अध्याय ९२।९३ द्वारकेचे व सोरटी सोमनाथ व प्रभासपट्टन तीर्थाचे वर्णन वाचत असतां मन उचंबळून आले व द्वारका पहाण्याची तीव्र इच्छा झाली. पण करणार काय ? एक तर पैशाचे बळ नाहीं आणि दुसरे गुजराथी बोली येत नाहीं, अशा रीतीने मनाच्या आंदोलनांत श्री सद्‌गुरू साईबाबांच्या छबीवर मन स्थिर केलेआणि म्हणालो, "बाबा, शिरडीच माझी द्वारका व तुम्हीच द्वारकाधीश." वेदान्तात सांगितले आहे कीं ब्रह्म आणि ब्रह्मशक्ति, पुरुष आणि प्रकृति ही एकच आहेत. हे केव्हांही दोन निराळे पदार्थ नव्हेत. पदार्थ एकच, मात्र तो कधीं पुरुषभावाने राहतो तर कधी प्रकृतिभावानें राहतो इतकेंच. ब्रह्म आणि ब्रह्मशक्ति ही दोन्ही एकच आहेत. मी ब्रह्मशक्तीलाच 'श्रीसाईबाबा' या नांवांने संबोधीत असतो. काय सांगू ब्रह्मशक्तीची लीला! दुसरे दिवशीं ह. भ. प. रणजीतसिंग जेठाभाई माझ्याकडे आले व म्हणाले, "डॉक्टर साहेब मी द्वारकेला जात आहे. आपण येतां कां ? मी म्हणालो, द्वारकाधीशाला माझा प्रणाम सांगा मला येतां येत नाही." त्यांनी कारण विचारले तोंच मी सांगितले, की मी गरीब आहे व माझ्याकडे खर्चाला द्रव्य नाही एवढेंच, तो हसला आणि म्हणाला की, "पैसा! अहो मी तुम्हांला नेत आहे. त्याची काळजी कां ?" त्यावर बाबांचीच ही माया हे मी कबूल केले. त्यांनी पश्चिम रेल्वेचे दोन बर्थ रिझर्व्ह केले. परंतु दोन दिवसांनीच नर्मदेला पूर आल्यामुळें रेल्वे वहातूक संपूर्ण तुटली होती, गाडयांचा प्रवास बंद झाला होता.

हे ऐकून व पेपरमध्यें वाचून खेद झाला व बाबांना प्रार्थना केली कीं "बाबा मी अज्ञ आहे. माझी पूर्ण निष्ठा आपणांवर. बाबा माझी द्वारका शिरडी, हे आपणांस सांगितले असतां मला आशा दाखवून माझी निराशा केलीत, तुमची मर्जी" रात्री स्वप्नांत येऊन सांगितले, "बेटा! क्यूं डरता, चलो हवासे." मी खडबडून जागा झालो. आणि अल्लामियाची करणी–दुसरे दिवशी श्रीयुत ह. भ. प. रणजीतसिंगने, विमानाने जामनगर व तेथून रेल्वेनें, द्वारका, सोमनाथ वगैरे ठिकाणी नेले. सौराष्ट्रांत जवळ जवळ १५ दिवस होतो. पोरबंदरला श्रीसुदाम्याच्या देवळाजवळ "घोंगडी बाबांची" भेट झाली.

केवळ पांडित्याद्वारे दिग्विजय मिळवून जीवन कृतार्थ होते हा समज चुकीचा आहे. जीवनाची सार्थकता भगवद्‌दर्शनाशिवाय होणे नाही हे माझ्या अंतःकरणांत दृढपणे जाणवले. आतां तुम्हीच सांगा मी श्रीसाईबाबांचा भक्त कां झालो ते ! माझा आत्मा हृदयस्थ-श्रीकृष्ण–श्रीसाईबाबा.

**"अस्पर्शयोगो वै नाम सर्वसत्त्वसुखोहितः।**
**अविवादोऽविरुद्धश्च देशितस्तं नमाम्यहम्॥"**

"सर्व जीवांनां सुख देणारा, त्याचे परम कल्याण करणारा, ज्यात वादविवादाचें कारण उरत नाही, जो कोणत्याहि मताचा विरोध करीत नाही त्या अस्पर्शयोगाला मी नमस्कार करतो."

हा अस्पर्शयोग म्हणजेच वेन्दाताची अत्युच्च अद्वैतानुभूतीची अवस्था होय.

## निस्संग राधा !

श्री. तु. नाईक

घुसळित चाले अंग राधा घुसळित चाले अंग
मुखामध्ये श्रीरंग तिचिया मुखामध्ये श्रीरंग ।। धृ. ।।
श्रीहरिवाचुनि कुणी न ठावा
मुरलीधर तो अेक विसावा !
चित्र खेळतां तरळ देखणें मनात अुठति तरंग ! ।। १ ।।
इथे तिथे तिज कृष्ण सावळा
मनांत दिसतो करितां चाळा !
डेऱ्यामध्ये दही घुसळितां ध्वनी अुठे श्रीरंग! ।। २ ।।
समाधीत त्या रंगुनि जातां
विचार नाहीं श्रीहरि परता !
चराचराच्या विस्मृतींत ती होअुनि जाते दंग ! ।। ३ ।।
संसाराचें नाते क्षणभर
विसरुनि स्मरते अवघा गिरिधर !
संग हरीचा राधेलागीं झाली ती निस्संग ! ।। ४ ।।

## इथें उभी मी !

श्री. तु. नाईक

इथें अुभी मी वाट पाहातें
तुझ्या भेटिच्या स्वप्नीं रमतें
किती बोचरा आहे वारा
जगात सखया नाहीं निवारा
नाहीं कुणाशीं माझें नाते ! ।। १ ।।
युगायुगांची विरही राधा
नसे कुणाशीं लागा बांधा !
व्यथा मनाची सांगू कुणातें ? ।। २ ।।
किती दिल्या मी तुजशी हाका
सोडशील का अपुला हेका ?
शपथ गळ्याची तुला घालितें ! ।। ३ ।।
भिरभिरती हीं पवनीं पानें
पिशाच्चापरी हलती रानें
प्रेमबावरी तुला शोधिते ! ।। ४ ।।

# साईनाथ

लेखक: र. श्री. पुजारी, पुणे

**देवच हे रूप घेऊन या आपल्या शिरडीत आला**

शिरडी गाव.

दुपारी भर बारा वाजण्याची वेळ.

पेठेतील दुकानांच्या फळच्या लागत होत्या. कपाळास गंध धावून व्यापारी मंडळी भोजनासाठी आतील बाजूस जात होती. कोणी देवास नैवेद्य दाखवून पानावर बसत होते. कोणी घास घेत होते. तोच बाहेर दारासमोर एक भिक्षेकरी उभा !

तेच जुनेपुराणे, मळकट कपडे. तोच आवाज. तीच नेहमीची मुद्रा:

अंगावर एक शंभर ठिकाणी फाटलेली कफनी. हातात एक गंजून गेलेले पत्र्याचे टमरेल. डोक्यास एक आडवे बांधलेले फडके.

याशिवाय त्या भिकाऱ्याजवळ काहीही नाही. कमरेला धोतर नाही की पायात तुटकी वहाणसुद्धा नाही.

घरात जेवत असलेले लोक केवळ आवाजावरून रोजच्या या भिकाऱ्याला ओळखत. वाढणाऱ्या बायकामंडळींना म्हणत: जा ! जा ! बाहेरच्या त्या फकिराला आधी एक तुकडा टाका. इकडे माणूस पानावर बसले की हा अगदी निमंत्रण केल्यासारखा दारात हजर! बरे, याला हाकलून द्यावा म्हटले तर तेही हातून होत नाही. बाराच्या वेळी भिक्षेकऱ्याच्या रूपाने दारी कोण येईल नेम नाही.

जेवता जेवता माणसे बहुधा रोजच हा विषय बोलत.

म्हणत: तुम्ही माणसाच्या दिसण्यावर जाऊ नका. जे असे दिसतात खुळे-भोळे, तेच पक्के वेरकी असतात. या बेडया फकिराला नेमकी आमच्या जेवणाखाण्याची वेळ तेवढी कशी कळते हो ! दीनवाणा आवाज काढला की भिक्षा मिळते. हे त्या खुळ्यावावळ्याला कसे समजते हो ! तुम्ही चार वेळा ह्याला भिक्षा वाढा; भिक्षेसाठी तो पुन्हा पाचव्यांदा हजर ! असे एका दिवसात पाच पाच वेळा भिक्षा घेणारे ते दत्तमहाराज नव्हते !

कुणी म्हणत: अहो ! बोलून चालून एक वेडे ते ! त्याला काय शहाणपण आहे? मागेल त्या दिवशी दिवसातून दहा दहा वेळाही भिक्षा मागेल ! नाही त्या दिवशी त्या पडक्या मशिदीच्या कोपऱ्यात स्वस्थ झोपून राहील !

खरे म्हणजे त्याची दया आपणालाच आली पाहिजे. नाहीतर दुसऱ्या कोणाला येणार? अन्नापाण्याविना एखाद्या दिवशी ते वेडे कोठे मरून पडलेलेसुद्धा कोणाला कळावयाचे नाही.

त्या फकिराकडे कुणी दयेच्या दृष्टीने पाहात. कुणी त्याची कीव करीत. कुणी म्हणत: सगळ्या माणसांना काही एकाच मापाने मोजता यायचे नाही. वेडा कोण, शहाणा कोण; साधू कोण, भोंदू कोण याची परीक्षा अशी वरवर पाहून होणार नाही,

आता हेच पाहा की. सगळ्या गावातून अन्न मागून आणून हा वेडा त्याचे काय करतो माहीत आहे ? अन्न तो सर्वांना वाटून टाकतो. भिकाऱ्यांना, आंधळयांना, थोटचांना, आजाऱ्यांना, म्हाताऱ्यांना फार कशाला, कावळचांना आणि कुत्र्यांना-सुद्धा !

अहो ! ज्यांना ना घर ना दार; ना कोणी जवळचे; अशाना म्हातारपणात आजारात, दारिद्र्यात आधार कोणाचा ? अन्नासाठी कोणाच्या तोंडाकडे त्यानी पाहायचे? दुष्काळात माणसे आणि जनावरे अन्नाविना टाचा घासून मरतात तशी एक दिवस त्यांची गत व्हायची.

–एक दिवस गावातील तात्या कोते पाटील हा तरुण दुपारच्या वेळी बाहेर पडला.

त्या वेडचा फकिराच्या मागून चालू लागला.

घरी येऊन आईला म्हणाला: आई ! तू म्हणालीस ते खरेच. तो फकीरबाबा वेडा नाही. चांगला शहाणा आहे. मनाचा फार कोवळा आहे. दुपारभर फिरून मी त्याच्यावर बारकाईने लक्ष ठेवले. भिक्षा आणून सगळी झोळी त्याने कोपऱ्यावरील त्या मातीच्या कुंडीत झोतली. आणि तुला सांगतो, पोरे जशी खाण्यासाठी आईशी झोंबतात तशी तेथे कुत्री आली. भिकारी आले. त्यांची पोरे आली. ही जत्रा तेथे जमली!

ही हकिगत सांगता सांगता तात्या कोत्याचे डोळे भरून आले.

तो आईला पुढे म्हणाला: आई ! काय सांगू ? कुंडीतील त्या भाकरींचा त्या भिकाऱ्यांनी बघता बघता चट्टामट्टा केला बघ. अन्न अगदी चाटून पुसून खाल्ले.

अन्नाचा कण म्हणून तेथे शिल्लक ठेवला नाही.

हे बघून तो वेडा फकीर आनंदाने हसू लागला. म्हणाला: अभी जावो. पानी पीवो. आराम करो. फिर तुम लोगोंको कल दोपहर खिलाऊंगा.

तात्या कोत्याची आई आनंदाने गहिवरली.

मुलाला म्हणाली: खरे म्हणतोस? त्यानी स्वत: त्या अन्नाचा एक कणही तोंडात घातला नाही म्हणतोस? मग त्या साधूने स्वत: खाल्ले तरी काय? का काहीच खाल्ले नाही?

तो मुलगा एक क्षणभर थांबला. म्हणाला: आई ! तुला खरेसुद्धा वाटणार नाही. तो साधू त्यानंतर एकाच्या दारी गेला. तेथे ओंजळीने भरभरून पोटभर पाणी प्यायला!

आई ! बाहेर आता संध्याकाळ झाली. आता त्या साधूला भिक्षा कोण घालणार? त्यापेक्षा तो पुन्हा पोटभर पाणी पिऊन घेईल. मग जाईल आपल्या पडक्या मशिदीत. गोणपाट अंथरून, उशाखाली हात घेऊन झोपायला.

तो मुलगा एकदमच बोलायचा थांबला.

एक क्षणभर गप्प गप्प उभा राहिला.

मग म्हणाला: आई! आज रात्री मी जेवणार नाही. माझ्या वाटणीची भाकरी बांधून दे. ती घेऊन मी मशिदीत जाईन. त्या फकिराला देईन ... बघ, आपल्या तोंडचा घास तो विचारा गोरगरिबाना घालतो. आणि लोक त्याला म्हणतात वेडा! खरोखर आई तो वेडा नव्हे. माणसासारखा दिसला तरी तो माणूस नव्हे. कुणी तरी देवच असला पाहिजे बघ तो.

तात्याची आई आपल्या मुलाचे हे बोल ऐकून पुन्हा गहिवरली. कानशिलावर बोटे मोडून म्हणाली: होय रे माझ्या लेकरा! अगदी कसा माझ्या मनातले बोललास बघ तू! अगदी प्रथम निंबाच्या झाडाखाली त्याना बघितले तेव्हापासूनच मला वाटले की देवच हे रूप घेऊन या आपल्या शिरडीत आला. गावाच्या कल्याणासाठी आला. तसे नसते तर एकदा गुप्त होऊन तीन वर्षांनंतर लग्नाच्या वऱ्हाडातून ते पुन्हा कशाला आले असते ?

परंतु त्यांच्या जिवाला राहवले नाही बघ. म्हणून पुन्हा आले लीला दाखवू लागले. पण साधुसंतांचे काय सांगावे बाळा ! वागणे-बोलणे-वेष–सगळे अगदी खुळ्चा-सारखे. दुसऱ्यावर धावून जातील. धोंडेसुद्धा मारतील. जणू आपण त्या गावचे कोणी-सुद्धा नव्हे!

आता हेच बघ की: भरलेली अन्नाची झोळी खुशाल कुंडीत ओतली! हे बघून लोक काय म्हणतील की हे एक खुळेच आहे! भीक मागून आणलेले अन्न आपण खावे एवढा शहाणपणासुद्धा याच्या अंगी नाही! आता तूच सांग, अशा लोकांना म्हणावे तरी काय! शहाणे का खुळे?

बायजाबाईनी–तात्याच्या आईने आत जाऊन एका फडक्यात भाकरी बांधली. दुपारची भाजी, चार कांदे, उकडलेली चार रताळी बरोबर दिली. तात्याला ती म्हणाली: आधी त्या पडक्या मशिदीकडे जा. महाराज तेथे असतील. त्याना समोर बसवून ही भाजीभाकरी खायला घाल. ते रागावले, काही बोलले तरी तेथून निघून येऊ नको. त्यानी विचारले की तू कोण, तर त्याना सांग: म्हणावे की मी तुमच्या बहिणीचा मुलगा. भाचा. तुमच्या बहिणीने ही भाकरी दिली आहे. आणि गळ्याची शपथ घालून सांगितले आहे की तुम्ही आज जेवला नाही तर माझी आई सुद्धा आज जेवणार नाही. तोंडात पाणी घालणार नाही.

त्या मुलाला आपल्या आईचा हा विचार एका क्षणात पटला.

भाकरीचे गाठोडे त्याने उचलले. मोठ्या आनंदाने मशिदीकडे तो निघाला.

**५. आज उकिरड्यावर असला तरी हा प्रत्यक्ष हिरा आहे.**

मंदिर काय किंवा मशीद काय–उभी राहाते ती भक्तांमुळे.

भक्तच तेथे देवास खेचून आणतो. आपल्या प्रेमभक्तीमुळे देवास तेथे बांधून ठेवतो.

आता कलियुगात भक्तीच जेथे अनाथ, तेथे देव कोठून येणार? मंदिर किंवा मशीद यांची अनाथ अवस्था कशी बदलणार?

शिरडीतील मंदिरे दिवसेंदिवस मोडकळीस आली. त्यांची पडझड होऊ लागली. संध्याकाळच्या सुमारास तेथे दिवा लागला तर लागला. अन्यथा पूजा-आरती-नैवेद्या-विना देव अंधारात उभा! जणू देवांना वनवास आला. कष्टदशा आली. लोकांना त्यांची अडगळ वाटू लागली.

परंतु देवांचे हे दिवस कोण पालटणार? धर्मावर आलेली काजळी कोण झाडणार? जो तो स्वार्थात मग्न. हेवेदावे तर सर्वांच्या पाचवीला पुजलेले. नवीन पिढीचा करमणुकीचा विषय एकच–देव, ब्राह्मण, साधुसंत, धर्मग्रंथ यांची अहोरात्र निंदा!

काशीनाथ शिंपी, अप्पा जागले आणि म्हाळसापती या शिरडीतील तीन व्यक्ती तर नवीन पिढीच्या कुचेष्टेचा विषय होऊन बसल्या.

गावातील कुटाळ लोक त्यांच्याविषयी बोलू लागले–

"सोनार-शिंपी-कुळकर्णीअप्पा! त्या सोनाराच्या–म्हाळसापतीच्या अंगात खंडोबा नेहमी संचारलेला! रस्त्यात दिसेल त्याच्या कपाळाला हा खुळा-खंडोबा भंडारा लावतो! टाळ-माळ-बुक्का याशिवाय वारकरी नाही. जत्रा-कुत्रा-भंडारा याशिवाय त्या मल्हारी मार्तंडाला विषय नाही.

आता तर त्याला स्वर्ग दोन बोटे उरला. म्हणतो: मशीदीतील साईबाबा म्हणजे प्रत्यक्ष मल्हारी मार्तंडच!

त्या साईबाबाचे पाय काय चेपतात !

गंध-फूल घालून त्याची पूजा काय करतात ! त्या काश्या शिंप्याने तर या नवीन महाराजासाठी एक हिरवी कफनी शिवली. हिरव्या रंगाची टोपी त्याच्या डोईवर ठेवून दिली. जणू श्री दत्तात्रेय येथे गैबी रूपाने प्रकट झाले आहेत !

पण त्या वेडयाला त्याचे काय ! श्वानाला नेऊन सिंहासनावर बसविण्याचाच हा प्रकार !

त्याने टाकली ती कफनी एक दिवस कोणाला देऊन. त्या टोपीचीही गत तीच. पुन्हा उघडा. पुन्हा अंगावर ती पूर्वीचीच फाटकी, चिंध्यालक्तरं, ढगळ कफनी ! अहो ! कुत्र्याचे शेपूट किती जरी नळीत घातले तरी ते कधी सरळ होणार आहे काय ?"

गावातील टवाळ तिकटीवर बसून अशा रीतीने बोलू लागले की त्यांच्या जिभेला धार चढे. त्यात सोनार-शिंपी-अप्पा यांच्या जोडीला तात्या आणि बायजा ही दोन नावे येऊ लागली. या पाच व्यक्तीवर आता कवने होणार आणि ती सार्वजनिक ठिकाणी पोवाड्याच्या सुरात कानशिलावर हात धरून गायिली जाणार येथपर्यंत तयारी झाली. उपरोधाने बोलून मंडळी हशा पिकवू लागली :

"त्या बायजी पाटलिणीला अख्ख्या गावात कोणी भाऊ मिळालाच नाहीं ! म्हणून त्या वेडयाच्या नादाला लागली !

बाकी त्या वेडयाची चैन आहे म्हणा ! चांगली ऊन ऊन भाकरी-कालवण घेऊन ही बहीण त्याला शोधत काटेकुटे तुडवीत रानात जाते. हा नशेत असला तर

एखाद्या पोराला भरवावे तसे त्याला आपल्या हाताने भरविते ! त्याने शिव्या दिल्या तरी त्या खाते. वर म्हणते : महाराज ! तुमच्या पोटात दोन घास गेले. आता मला घोर नाही.

बायजाबाई ! तुम्हाला हो कशाला त्या वेड्याच्या पोटापाण्याचा घोर ! त्याची काय एक तऱ्हा आहे म्हणून तुम्ही घोर कराल !

त्याला रोज तंबाखू लागते. लाकडाच्या ढलप्या लागतात. तेल लागते. चिंध्या लागतात. मातीच्या दोन कच्च्या घागरी लागतात.

आपले हे गाव म्हणजे सगळ्या जगाची तिकटी. येथे कोणी व्यापारधंद्यासाठी येणार. कोणी तीर्थयात्रेच्या वाटेवरचे गाव म्हणून थांबणार. त्या प्रत्येकाचा घोर तुमच्या जिवाला लागला तर तुमच्या तात्याबाळाकडे हो कोण बघणार ! म्हणून सांगतो ते ऐका घरचे खाऊन लष्करच्या भाकरी भाजायचा हा घोर तुम्ही आता सोडून द्या. निवांत हरी हरी म्हणत बसा !

नदीच्या पाणवठ्याला जशी जनावरे, तसे या आपल्या गावाला साधू. एक येथून खाऊन पिऊन अजून गेला नाही की दुसरा त्याच्या जागी लगेच हजर !

हा कोण, तर देवीदास साधू ! तो कोण, तर जानकीदास साधू ! मारला कपाळावर एक गंधाचा नाम की झाला साधू ! साधू ! कसले ! सगळे एका माळेचे मणी ! भोंदू मंबाजीबावा !

कोणीही साधूने या गावी यावे. खुशाल सांगावे : वाटेत आम्ही यात्रेकरू साधू. निघालो होतो रामेश्वराला. वाटेत ही पवित्र भूमी दिसली. वाटले, आजच्या रात्री येथे मुक्काम करावा. संतांच्या या पुण्यभूमीची धूळ कपाळी धारण करावी.

अशी धूळ येथे फार. मग साधूंना काय कमी ! त्यांचे रामेश्वर-पंढरपूर हेच.

या गावी साधूंना काही कमीही पडत नाही. भक्तांचाही तुटवडा नाहीं. आला साधू की घे त्याच्या पायाचे तीर्थ !

हे चरणतीर्थ एकदा भक्ताच्या पोटात गेले की पाठोपाठ त्या साधूचा हुकूम : काशीराम ! तू एक करीत जा. मुंग्यांना रोज साखर घालीत जा. तुझ्या इडापिडा नष्ट होतील.

झाले. त्या दिवसापासून काशीरामाने पिठीसाखरेचे एक गाठोडे नित्य जवळ बाळगले ! कोठेही स्मशानात गेला तरी ते गाठोडे जवळ ! अगदी पोटाशी !

मग मुंग्या शोधण्याचे काम सुरू !

दिसली मुंगी की तिला साखर ! जेथपर्यंत मुंग्यांची रांग, तेथपर्यंत हा शहाणा रांगत जाईल ! अगदी वारूळापर्यंत सरपटत जाऊन बेताने त्यांना साखर घालील ! न जाणो, एखाद्या मुंगीने साखर खाल्ली नाही तर !

मग भेटेल त्याला सांगेल : देवीदासबाबा म्हणाले, काशीराम ! तू मुंग्यांना साखर घालीत जा. इडापिडा नष्ट होतील.

हे सगळे बाबा, महाराज, दास आणि नाथ आमच्या इडापिडा नष्ट करणार ! आमचे सगळे आबादीआबाद होणार ! घरी लक्ष्मी पाणी भरू लागणार ! अष्ट-सिद्धी, नवनिधी घरात बसल्या बसल्या चालत येणार ! मग व्यापार, शेती, धंदा नोकरी करण्याचे आपणास कारण हो काय ? जावे आणि त्या गंगागीरबाबांचे पाय धरावे! ते आपल्या ठाण्यावर नसले तर अक्कलकोटस्वामीचे गादी-वारस आनंदनाथ महाराज आहेतच. तेही आपल्या ठाण्यावर नसल्यास हे नवीन आलेले भक्तनिरंजन, भक्तकैवारी जगदोद्धारक श्रीसाईमहाराज येथे आहेतच : नवनाथापैकी तर ते शेवटचे नाथ ! भगवान श्रीसाईनाथ !

असो उत्तम साधु-पंचायतन येथे जमले आहे !

याने त्याच्या रूपाची वाखाणणी करावी. त्याने याच्या आवाजाची वाखाणणी करावी. अहो रूपं, अहो ध्वनि. गाढवाचा आवाज; उंटाचे रूप ! छान जुळणी आहे.

हे नवे आलेले दत्तमहाराज म्हणजे तर सकल गुणांची मूर्ती. अंगात रग फार. घेतली एक कुदळ की केली बाग.

पाहाल तेव्हा हातांत मातीच्या दोन घागरी. त्या घेऊन दिवसभर बागेला पाणीच घालीत आहेत!

हे एकदा त्या गंगागीरबाबाने बघितले. म्हणाला: ही मूर्ती येथे कधी आली ? हे केवळ रत्न आहे. याची योग्यता फारच मोठी आहे. या शिरडी गावाचे भाग्य फार मोठे की हे रत्न तुम्हाला लाभले.

पाहिलेत? ज्याला डोके नाही, काडीची अक्कल नाही त्याला या शहाण्यांनी ‘रत्न’ ठरविले ! संगनमत करून रत्न ठरविले! आता पुढची हकिगत ऐका. आणखी गमतीची आहे.

माधवराव देशपांडे, दगडू नायके, नंदराम मारवाडी, भागचंद मारवाडी हे सगळे भगत गाडी करून एकदा आनंदनाथ महाराजांच्या दर्शनाला गेले. दर्शन करून परत गाडीत बसले. गाडी निघाली. सहज मागे पाहातात तो कोणी एक व्यक्ती गाडीमागे धावत आहे. थांबा! थांबा! म्हणून ओरडत आहे.

ते कोण होते म्हणाल, तर खुद्द आनंदनाथ-महाराजच! काहीही बोलले नाही सरळ गाडीत चढले. नंतर म्हणाले: मीही तुमच्याबरोबर शिरडीला येणार! येवल्याचे आणि नेवरगावचे भक्त गाडीच्या मागे धावत होतेच. ते पुढे येऊन गाडीला आडवे झाले. म्हणाले : महाराजांना आम्ही सोडणार नाही. त्यांना शिरडीला कसे नेता बघतो.

पण बैल चौखूर सुटल्यावर त्यांचे काय चालणार? बिचारे हात हलवीत परत गेले.

इकडे आनंदनाथमहाराज शिरडीत येऊन पोचले. त्या वेडचा फकिराला वाटेत पाणी आणताना कोठे पाहिले. आणि काय म्हणाले माहीत आहे? म्हणाले: हा हिरा आहे. याची खरी किंमत तुम्हाला नाही. हा जरी आज उकिरड्यावर असला तरी प्रत्यक्ष हिरा आहे हिरा! हे ध्यानात ठेवा.

बोलणाऱ्या टवाळखोर व्यक्ती फिदीफिदी हसू लागल्या.

मग म्हणाल्या: बघितलेत? अशा हिऱ्याची पारख आपल्यापैकी कुणालाही झाली नाही. केवढे हे आपले पाप! आपण अज्ञ, पापीजन त्याना गारगोटी समजलो.

हे ऐकून कोणी तरी म्हणाले: पैलू पडल्याशिवाय अशा हिऱ्याचे तेज आमच्यासारख्या अस्वच्छ लोकांच्या डोळ्यांना कसे दिसणार! जसा हिरा, तसेच त्याचे पारखी!

एवढ्यात कोणीशी चौकशी केली. अरे! तो हिरा अलिकडे कोठे दिसत नाही बहुधा निंबाखाली असेल. आपल्या गुरूंच्या समाधी जवळ!

कोणी तरी उत्तर दिले: छे रे! त्या कबरीजवळ बसून त्याला काय मिळणार! तो गेला असेल दूर रानात. ओढ्याकाठी किंवा बाभुळवनांत किंवा कुणाच्या मळ्यात! अगदी गुप्त ठिकाणी! काटेरी झुडुपात किंवा दाट जंगलात. तेथे त्याचे काम गुप्तपणे रात्रंदिवस चाललेले असेल. एका क्षणाचीही त्याला फुरसद नसेल.

भाबडेपणाने एकाने विचारले: कसले काय ?

त्याला उत्तर मिळाले: कसले म्हणजे? पैलू पाडण्याचे! बाबारे! एकांतात हिऱ्यावर पैलू पडतात तेव्हाच त्याचे खरे तेज जगाला दिसते.

"मग काम बंद तरी केव्हा ठेवतात?"

"केव्हा म्हणजे? भूक लागेल तेव्हा! त्याचे असे आहे, भूक लागली की माणूस समोरील कामधंदा विसरते पुढे आलेल्या अन्नावर तुटून पडते!

कुटाळांच्या कुटाळक्या अशा रोज रंगत.

काशीराम, अप्पा किंवा म्हाळसापती यांच्यापैकी कोणीही रस्त्यात दिसले की कुटाळखोर दोन्ही हात जोडून कपाळाशी नेत. मित्र मंडळीना डोळा घालून हळूच म्हणत: अरे! आमच्या अन्नकोटाला कोणी अन्न द्यारे! आमच्या यज्ञाला कोणी ढलपे द्या रे! आमच्या पणत्यांना कोणी तेल द्या रे! आमच्या फुलझाडांना पाणी घालायला कोणी मातीच्या घागरी द्या रे!

जमलेली पोरेसोरे या केविलवाण्या हाका ऐकून हसत. पोट धरधरून हसत.

लोक म्हणत: पोरानी आता त्या साईची पाठ धरली आहे. त्याला एक दिवस गावातून पळवून लावला की यांचे डोळे थंड झाले. दुसऱ्या कोणा साईच्या मागे हात धुऊन लागायला हे पुन्हा मोकळे झाले.

—x—

# संगम

गंगा गोदा अन् कावेरी
संगमांत कल्पकता न्यारी
निर्मिण्यांत अस्मिता सागरीं
अक्षय अमृत-लहरी मधुनी
एकात्मकता वाहो भरुनी ।। १ ।।

हिम-फत्तर-चंदन-जल-नर्तन
मृदु कणखरता नसानसांतुन
व्देषाग्नीला अग्नी देऊन
स्नेहाचे संगीत बरसुनी
एकात्मकता वाहो भरुनी ।। २ ।।

इंद्रधनूची रंगसंगती
छटा कशा मिसळून नांदती
शुभ्रतेमधें लोप पावती
विविधतेत एकत्व प्रगटुनी
एकात्मकता वाहो भरुनी ।। ३ ।।

मोरपिसांचा तलम गालिचा
मिलाफ नैसर्गिक रंगांचा
मोहक नमुना समरसतेचा
समाजजीवन तसे रंगुनी
एकात्मकता वाहो भरुनी ।। ४ ।।
संगम होइल तेव्हां होवो
भावनैकता लगेच येवो
मानस एक सरोवर होवो
एकरूपता सदैव टिकुनी
एकात्मकता राहो भरुनी

—शशिकांत पाळंदे
डोंबिवली (पूर्व)

*—*—*—*

# श्रीगोंदवलेकर महाराज व्यक्तिदर्शन

(चालू लेखमाला)

—ले. श्री. मु पु. अत्रे

**नर्मदा तटाकीं श्रीमहाराजः**

कांहीं दिवसांनीं श्रीमहाराज भय्यासाहेबांना घेऊन नैमिषारण्यांत गेले. तिथें त्यांनी पुष्कळ योगी महात्म्यांची भेट घेतली व भय्यासाहेबांना त्यांचीं दर्शनें घडविलीं. परत येतांना ते नर्मदा तटाक धरून आले. एकदां गर्द झाडीच्या वाटेंत भय्यासाहेबांना फार तहान लागली म्हणून श्रीमहाराजांनीं त्यांना एका गुहेंत नेलें. आंत एक स्वच्छ पाण्याचा झरा होता. तिथें पोटभर पाणी प्याल्यावर ते आणखी आंत गेले. दोनतीनशें पावलांवर त्यांना एक ध्यानस्थ योगी दिसला. त्याची दाढी व जटा जमिनीवर लोळत होत्या. जराशानें त्यानें डोळे उघडून पाहिलें व विचारलें, "रामावतार झाला कां?" श्रीमहाराज त्याला म्हणाले, "कां बरें?" तेव्हां तो योगी म्हणाला, "रामदर्शन व्हावें म्हणून मी समाधि लावून बसलों होतों. रामावतार झाला असेल तर मी दर्शनास जाईन." यावर श्रीमहाराजांनीं सांगितलें, "यतिराज, रामावतारानंतर कृष्णावतार होऊन आतां कलंकी अवताराचा प्रथमचरण चालू आहे." हें ऐकून तो योगी फार निराश झाला. श्रीमहाराजांनीं त्याच्या मस्तकावर हात ठेवून त्याला पूर्णपदाला नेलें.त्याच्या डोळयांत आनंदाश्रु चमकले व त्यानें श्रीमहाराजांना वंदन करून देह सोडला. श्रीमहाराज भय्यासाहेबांना म्हणाले, "रामदर्शन घेऊन देह सोडावा हा या मुनीचा संकल्प होता म्हणून त्यानें समाधियोगानें अनेक वेळां काळाला परत पाठवलें. रामावतार होऊन गेला आणि हा मात्र तसाच राहिला ! तरी पण आज रामानें त्याचें कल्याण केलें! देहबुद्धीचीं माणसें ज्या स्थानापर्यंत जाऊंसुद्धां शकत नाहींत अशा गहनगूढ ठिकाणीं पुष्कळ महात्मे सर्व भारतभर योगसाधनें करीत आहेत."

श्रीमहाराज नैमिषारण्यांतून हर्द्याला गेले. तेथें काशिनाथ भैया सावकारानें महाराजांच्या हस्तें पट्टाभिषिक्त रामाच्या मूर्तींची प्रतिष्ठापना करविली. व नाशिकहून ते घरीं आले.

**सन १८९६ चा दुष्काळः**

सन १८७६ नंतर वीस वर्षांनीं दुसरा दुष्काळ पडला. पण याची तीव्रता जरा कमी होती. पूर्वीप्रमाणेंच श्रीमहाराजांनीं शेताच्या कामावर एक वेळचें जेवण देण्याची व्यवस्था केली. म्हाताऱ्यांना व मुलांना ते एक वेळचें धान्य देत. शिवाय मंदिरांत बसून दहा हजार नामजप करणाऱ्यास एकवेळ जेवण मिळे. तसेंच ब्राह्मणांना अनुष्ठानाला बसविलें. त्यांना रोज जेवण व शेवटीं एकेक वस्त्र दिलें. गाईसाठीं एक गोशाळाही महाराजांनी बांधविली.

**विष्णुबुवा कुंभोजकरः**

गोंदवल्यास बहुतेक लोक प्रापंचिक दुःखें घेऊनच दर्शनाला येत होते. पण क्वचित् जे केवळ परमार्थासाठीं येत होते अशांपैकीं विष्णुबुवा कुंभोजकर यांना अंबडहून आनंदसागरांनीं पाठविलें होतें. श्रीमहाराजांचें पदोपदीं ज्ञान-वैराग्य बारकाव्यानें अवलोकून त्यांना अननुभूत समाधान झालें व त्यांचा अनुग्रह घेण्याची उत्कंठा लागली. म्हणून त्यांनीं तशी विनंती केली असतां श्रीमहाराजांनीं त्यांना त्यांच्या पूर्वगुरूचा शिवमंत्रच दिला व म्हटलें, "हरिहरांत भेद नाहीं. स्नानानंतर जप करावा व एरव्हीं रामनाम घ्यावें." विष्णुबुवांनीं लय लावून जप केला व श्रीमहाराजांच्या अनुमतीनें द्वादश ज्योतिर्लिंगांची दर्शनें घेतलीं व मोठीं क्षेत्रें पाहिलीं. पुढें त्यांना दीक्षेचा अधिकार प्राप्त झाला. वऱ्हाडांतील शेंदुरणी गांवीं त्यांनीं श्रीमहाराजांचा मठ स्थापन करून आमरण नामाचा प्रसार केला.

**हरिहरांत भेद मानूं नये:**

सांगलीचे विष्णुपंत नगरकर पोष्टमास्तर अत्यंत कडक शिवभक्त होते. ते कृष्णाची व त्याच्या लीलांची निंदा करून हंसायचे. एका पहाटे पार्थिवपूजा झाल्यावर ते ध्यानस्थ बसले, पण ध्यान न लागतां सुषुप्ति अवस्थेंत गेले. त्यांत असा प्रकार दिसला कीं, एका संथ वाहणाऱ्या नदीच्या तीरावर एक शिवमंदीर आहे. पंत स्नान करून मंदिरांत पूजेला गेले. तेथें गंध लावतांनाच पिंडीमधून श्रीमहाराज प्रकट झाले. पण हा सिद्ध पुरुष कोण हें पंतांना ठाऊक नव्हतें. त्यांनी उठून चरणांवर मस्तक ठेवलें व हात जोडून उभे राहिले. श्रीमहाराज म्हणाले, "विष्णुपंत, तुम्ही शंकराचे निष्ठावंत भक्त आहांत. पण कृष्णाची निंदा कां करतां? परमात्म्याचे हे सगुण अवतार आहेत हें तुम्हाला माहित नाहीं काय? हरिहरांत भेद नाहीं असें श्रुति आणि स्मृतीहि सांगतात. म्हणून आजपासून तुम्ही शाळिग्रामाची पूजा करा. श्रीशंकर निसंशय तुम्हाला दर्शन देतील." आणलेल्या पूजासाहित्यानें त्यांनीं श्रीमहाराजांची पूजा केली. श्रीमहाराजांनीं त्यांच्या पाठीवरून हात फिरविला व 'पुन्हां आपली भेट होईल' असें सांगून ते गुप्त झाले. येथें पंत देहावर आले आणि स्वस्थ बसले. श्रीमहाराजांचा ठसा त्यांच्या अंतः-करणावर फार खोलवर उमटला, इतका कीं जरा त्यांनीं डोळे मिटले तरी श्रीमहाराजांचें ध्यान प्रकट होई. असें कांहीं दिवस गेल्यावर आश्वासनाप्रमाणें त्यांची अजून भेट होत नाहीं म्हणून पंतांच्या जिवाला तळमळ लागली. श्रीमहाराजांचे वर्णन ज्यांना त्यांना सांगून ते विचारूं लागले कीं, "अशा वर्णनाचा सत्पुरुष तुम्हाला कोठें दिसला कां?" आपल्या एका मित्राला त्यांनी असेंच विचारल्यावर तो म्हणाला, "परवांच मी पंढरपूरला राममंदिरांत त्यांचें दर्शन घेऊन आलों. त्यांना श्रीगोंदवलेकर महाराज म्हणतात." विष्णुपंत तडक पंढरपूरला गेले.

इकडे श्रीमहाराज आदल्या दिवशींच जाणार होते. परंतु एक बाई आपल्या लहान मुलीला घेऊन दर्शनाला आल्या होत्या त्यावेळीं श्रीमहाराजांनीं त्या मुलीला सहज

विचारलें, "बाळ, मी आज गोंदवल्यास जाऊं कां?" ती म्हणाली, "आज नको" श्रीमहाराजांनी भरलेलें सामान गाडींतून उतरवलें व कमरेवर हात ठेऊन दरवाज्यांत कोणाची तरी वाट पहात उभे राहिले. पंतांनीं त्यांना लांबून ओळखलें आणि त्यांना स्वर्ग ठेंगणा झाला. भावनेनें आनंदाश्रु येत असतां त्यांना चालण्याचें अवसान राहिलें नाहीं, पण श्रीमहाराजच पुढें जाऊन त्यांनीं पंतांना आलिंगन दिलें. श्रीमहाराजांनीं, "शाळिग्रामाची पूजा होत आहे ना?" येवढेंच विचारलें व पंतांनीं मानेनेंच होकार दिला. दोन दिवस राहून झाल्यावर त्यांनीं अनुग्रह मागितला. महाराजांनी शंकराला प्रिय असलेलें रामनामच त्यांना दिलें.

**गोदूबाईच्या मुलाची मुंज:**

अबकारी अधिकाऱ्याला भविष्य सांगणाऱ्या गोदूचें पुढें लग्न होऊन यथाकाल तिला मुलगा झाला व त्याच्या सहाव्या वर्षीं त्याची मुंज करण्याचें ठरलें. मुंजीला श्रीमहाराजांना गोंदवल्याहून येणें शक्य नव्हतें म्हणून त्यांनीं आशीर्वाद पाठविले. मुंजीनंतर भोजनाची पंगत वाढली गेली. पण अन्नशुद्धि वाढण्याच्या वेळीं गोदूच्या पोटांत धस्स् झालें, कारण बाहेर गांवाहून मागविलेलें पंक्तीचें तूप आलें नव्हतें! म्हणून ती बावचळून एकदम देवघरांत शिरली व श्रीमहाराजांच्या प्रतिमेसमोर बसकण मारून तिनें, "महाराज!" म्हणून टाहो फोडला. श्रीमहाराज प्रकट होऊन चटकन् म्हणाले, "गोदू, आण तुझें तुपाचें भांडें." तिनें रोजचें भांडें आणून दिलें. त्यांत साधारण पावशेर तूप होतें. श्रीमहाराजांनीं कफनी कमरेला गुंडाळून स्वत: तीनशें पानांवर तूप वाढलें व भरलेलें भांडें घरच्या पंक्तीसाठीं परत केलें आणि म्हटलें, "गोदू, तूं आपल्याला रामाची भक्त म्हणतेस ना? मग एवढ्या क्षुल्लक कारणानें घाबरून गेलीस? असो. रामाला विसरूं नकोस. मी येतो." असें म्हणून ते गुप्त झाले. गोदूला एक अक्षरही बोलण्यास वेळ मिळाला नाहीं.

**योगभ्रष्ट शांता:**

आईसाहेबांना दोन मुलगे व एक मुलगी होती. मुलगे तान्हेपणींच गेले होते. मुलगी पित्याप्रमाणें गोरीपान व देखणी होती. ती मुळीच रडत नसे म्हणून श्रीमहाराज तिला 'शांता' म्हणत. दीड वर्षाची झाली तरी तिला बोलतां येत नव्हतें पण खुणेवर सर्व कांहीं चाले, आणि खेळणें-वागणें थेट एखाद्या रामोपासकासारखें असे. एकदां तिच्या मावशीनें कडेवरून तिला तुळशीवृंदावनापाशीं नेलें. तेथें एक बाई प्रदक्षिणा घालीत होती. त्या झाल्यावर कौतुकानें तिनें आपली पुतळ्यांची माळ शांताच्या गळ्यांत घातली. एवढ्यांत श्रीमहाराज तेथें सहज येऊन त्यांनी ती पाहिली व म्हटलें, "शांता, तुझी माळ मला दे बघूं!" तिनें माळ काढण्याची मावशीला खूण केली, मावशीनें ती काढली व तिच्या हातांत दिली. तिनें ती लगेच श्रीमहाराजांना देऊन टाकली. ते म्हणाले, "तुला नको?" त्यावर मुलीनें मावशीला तुळशीजवळ नेण्यास खूण केली. मग तिनें एक पान खुडलें व त्या माळेवर वाहिलें. हें पाहून श्रीमहाराजांनीं आशीर्वाद दिला, "शांता, भाग्यानें लाभलेली संगति तुझें कल्याण करील." पुढें सहा महिन्यांनींच शांता कालवश झाली. (क्रमश:)

# रामगीतांजलि

(पुष्प ८ वे)

मारीचास सुवर्णमृगाचे रूप घ्यावयास सांगून रावण त्यामागून यतिवेषाने सीतेच्या आश्रमाकडे येतो–

वेष यतीचा; इच्छा दारुण।
अरण्यांत तो शिरला रावण ॥ धृ० ॥

कषायवस्त्रे जटा शिरावर। पदीं खडावा छत्र धरी वर।
दंड-कमंडलु शोभित ते कर। केलें अंगीं भस्मविलेपन ॥ १ ॥

प्रणवघोष तो ओठावरती। कपटी डोळे परि लुकलुकती
पाहत चाले अवती भंवती। कानोसा घे मधेंच थांबुन ॥ २ ॥

राखेंतील अग्नीपरि निर्मम। काम अंतरीं,–वदनीं संयम
भीषण आच्छादित कूपासम। व्याघ्रापरि नी-रव संचारण ॥ ३ ॥

दहा मुखांच्या दहा वासना। एक जाहल्या दोन्ही नयनां
होइ भिकारी असुनी राणा। झोळी खांद्यावरि लटकावुन ॥ ४ ॥

अपशकुनांनी नभ झाकळलें। भयें अनामिक तरु थरथरले
त्यांस लतांनीं अधिकचि धरिलें। वायु थबकला श्वासहि रोखुन ॥ ५ ॥

गोदावरिच्या चंचल लहरी। चकित जाहल्या स्तब्ध अंतरीं
धडकी भरुनी हृदयीं भारी। खगयुमें बसलीं भांबावुन ॥ ६ ॥

–उभी जानकी आश्रम दारीं। तिला पाहुनी कुशल विचारी
अतिथीसम ती त्यास आदरी। देई प्रत्युत्तर संकोचुन! –॥ ७ ॥

उठले चित्तीं विकल्प नसते। मनांत भय शापाचें येतें
पुन्हा पुन्हा ती पाहि वनातें। येतिल कधिं ते 'दोघे' परतुन? ॥ ८ ॥

–वि. अ. घैसास

सोनाळा ( ता. खामगांव ) विदर्भाचे एक सन्त

# श्रीसोनाजी महाराज

## ले. श्री. ना. हुद्दार

विदर्भांत १९-२० व्या शतकांत जे अनेक संत महापुरुष होऊन गेले त्यांत सोनाजी महाराजांचाहि अंतर्भाव होतो. नागपूरचे श्रीमंत चिटनवीस घराणें आणि श्रीमंत राजे भोसले यांचेशी त्यांचा संबंध आल्याने त्यांचें नांव विशेष प्रसिद्ध झालें.

### सोनाजी महाराजांचीं चरित्रें

संतकवि ह.भ.प. दासगणू महाराजांचे शिष्य श्री. वामन विठ्ठल तथा अण्णा महाराज दातार वकील, जळगांव, आणि कीर्तनकार यांनी संत सोनाजी महाराजांचे ११ अध्यायांचे ओवीबद्ध चरित्र लिहिलें असून तें सोनाळ्याचे श्री. भाऊराव गोविंदराव वैश्य सोनार यांनी ऑगस्टमध्यें प्रकाशित केलें आहे. एकूण ओव्यांची संख्या ११८१ आहे.

सोनाळाजवळील बाणवापी (बावनगीर) चे एक वैदिक ब्राह्मण शिवराम सदाशिव देशपांडे यांनीहि ६०८ ओव्या व ७ अध्याय असलेलें एक चरित्र वैशाख शुद्ध १२ शके १७९१ (इ. स. १८६९) ला लिहून संपविलें आहे. हें हस्तलिखित अजून अप्रकाशित आहे, आणि ९४ वर्षांपूर्वीचें जुने आहे.

दोन्ही चरित्रांतील घटना व चमत्कारामध्यें कांहीं फरक दिसून येत असला तरी संत सोनाजी महाराजांचे नागपूरास आगमन भोंसल्याचें राज्य खालसा होण्यापूर्वीं म्हणजे सन १८५३ पूर्वीं झालें होतें व त्यांनी समाधि १८६९ पूर्वीं वृद्धावस्थेंत घेतली , हें स्पष्ट आहे. दोन्ही चरित्रांत त्यांची जन्म तिथि शक व निधनशक दिलेले नाही ते तसेंच त्यांचे छायाचित्रही उपलब्ध झालेलें नाहीं.

### चिटनवीस घराण्यात दत्तक

भोसल्यांचे चिटनवीस गंगाधरराव माधवराम वैद्य चिटनवीस यांना पुत्रसंतान नव्हते, वृद्धावस्थेत आजारी पडले असतां त्यांच्याच वैद्यकुलांतील दत्तक घेण्याचे ठरलें. खामगाव जवळ गोंधनखेडा येथील निजामाकडून आलेली १२ गांवाची जहागीर होती ती पाहण्याचे काम चिटनवीसांच्या वैद्यकुलापैकीं हैबतराव पाहात असत. त्यांस माधवराव नांवाचा पुतण्या होता. तो ७-८ वयाचा असतां त्यास नागपूरला आणवून गंगाधरराव माधवराव यांस दत्तक देण्यांत आलें. माधवराव ३-४ वर्षांचे असतां त्यांची आई त्यांना कडेवर घेऊन सोनाळा येथे रथाची मिरवणूक पाहात होती. सोनाजी महाराजांचे तिचेकडे लक्ष जाताच त्यांनी तिच्या कडेवरील माधवरावला घेऊन पालखीत देवाच्या मूर्तीजवळ बसविलें व म्हणाले की, ' हा मुलगा फार भाग्यशाली होईल.'

दत्तविधानाचा समारंभ चिटनवीसांच्या वाड्याच्या दक्षिणेकडे असलेल्या मोकळ्या जागेवर संत सोनाजी महाराजांच्या उपस्थितींत झाला (सन १८३०) ही सुमारे साडे पांच एकर जमीन असून चिटनवीसांनी ती संत सोनाजी महाराजांस दिली. हिला 'सोनाजी बुवाची वाडी' हें नांव असून एका मंदिरांत पादुकांची स्थापना करण्यांत आली आहे. जवळच एक देवीचें व मारुतीचें मंदिर आहे. या वाडींत ३ विहीरी असून सोनाजी मंदिर, कार्तिक उत्सव व भंडारा या प्रीत्यर्थ वाडीचें उत्पन्न खर्चण्यांत येतें.

माधवराव तथा बाबासाहेब चिटनवीसांचे नातू विद्यमान श्री. माधवराव गंगाधरराव ऊर्फ राजाबाळसाहेब चिटनवीस (वय ८४) यांनी सोनाजी महाराजांचे मंदिर अलीकडे अद्यावत् २५-३० हजार रुपये खर्चून बांधलें असून नागपूरच्या या पूर्व भागांत एक चांगले आध्यात्मिक सांस्कृतिकेंद्र बनलें आहे. या मंदिराच्या कार्यास स्थायी स्वरूपाची मदत चालू राहावी म्हणून जवळ मंगलकार्यालयाची भव्य इमारत बांधली असून त्यांत वीज, पाणी, बिछायत, भांडीकुंडी आदि सामान किरायाने उपलब्ध करून दिलें जाते.

### जन्म व बाळपण

जळगांव जामोद तालुक्यात बावनगीर गांवी कुटे कुळांत सोनाजीचा जन्म झाला. बाळपणींच त्यांचे वडील व नंतर आई मरण पावल्याने ३-४ मैलावरील सोनाळा येथें त्यांचे मामा नागोजी सुके हे आपलेकडे त्यांस राहण्यासाठी घेऊन गेले व मामाकडील गुरांना रानांत चारण्यास नेण्याचें काम तें करूं लागले. लहानपणापासून गोविंद नामस्मरणाचा त्यांस छंद होता. मिळेल त्या आहारावर ते संतुष्ट असत. त्यांच्या राहण्यावागण्यावरून लोक त्यांना 'वेडा' समजून त्यांची कुचेष्टा करीत.

वयाच्या १० व्या वर्षी त्यांचे लग्न झालें. लोकदृष्टीने सोनाजी वेडे दिसले, तरी परमार्थ साधनाच्या बाबतींत ते सावध होते. त्यांनी एके दिवशी निर्वाणीची आळवणी केली आणि निर्धार प्रगट केला की, देवा दर्शन देऊन कृपा न केलीत तर मी प्राणत्याग करीन. भक्ताचा एवढा निर्धार पाहिल्यावर दयाळू चतुर्भुज चक्रपाणी ईश्वराची मूर्ति त्यांचेसमोर प्रगट होऊन त्यांचेकडे तिने कृपादृष्टीने पाहिलें.

### सोनाजींचा नित्यक्रम

सोनाजींचा नित्यक्रम असा होता की, सकाळी उठून गुरांना रानांत चारावयास घेऊन जावयाचे. दिवसा गुरांना पाणी पाजून व त्यांना झाडाखाली छायेत बसवून ते स्वतः विश्रांति घेत; आणि संध्याकाळी गुरें घरी परत आणून भोजनोत्तर गोठ्यांत झोपावयाचें. मध्यरात्री उठून कमरेला ढोलकें बांधून ते ६ कोसांवरील पर्वताच्या शिखरावर असलेल्या मांगेरीच्या महादेवाच्या दर्शनास जात. या देवळाजवळ तीन भुयारें असून दोन भुयारांच्या तोंडावर पाषाण ठेवण्यांत आलें होतें, तिसऱ्या भुयाराचें तोंड मोकळे असून त्यांत तीन आसनें होतीं. त्यावर कधी कधीं ऋषी

अनुष्ठान करतांना दिसत. मांगेरीच्या महादेवासमोर बंदी नाही हें त्याचें वैशिष्टय आहे. जवळच एक टाकें आहे. इतक्या उंचावर असूनही तें नेहमी मधुर पाण्याने भरलेलें असतें.

महादेवाचें दर्शन घेऊन परत येतांना भैरवगडाच्या मारुतीचें ते दर्शन घेत व चार घटका रात्र असतांच घरीं येऊन ते गोठ्यांत झोंपून राहात. बरेच दिवसांपर्यंत त्यांच्या दिनचर्येची कोणास माहिती नव्हती: लोक वेडा म्हणून त्यांची उपेक्षा करीत आणि आप्तेष्ट हंसत असत. लोक म्हणत की, हा स्वस्थानी राहून देवाची भक्ति कां करीत नाहीं? उगाच रानांत का भटकतो? रानांत गेल्यानेच उपासना सफ़ल होत असेल तर रानांतील श्वापदें हि ईशकृपेस पात्र मानावी लागतील.

सोनाजी महाराज लोकांच्या हंसण्याबोलण्याकडे लक्ष देत नसत. भक्ति करण्यास एकांतवास आवश्यक असल्यानें त्यांनी आपला नित्यक्रम चालूच ठेवला होता.

## सोनाजींना भैरवगडावर कोंडलें

एकदां मांगेरीवरून परत येत असतां भैरवगडाच्या मारुतीजवळ सोनाजी महाराज ढोलकें वाजवून भजन करण्यांत तल्लीन झाले होते. भैरवगडचा अधिकारी पैकाजी बाजारीच्या झोपेंत व्यत्यय आल्यानें त्यानें दूत पाठवून ढोलकें वाजविण्याऱ्यास अटक करून आणण्यास सांगितलें. दूतांनी त्यांना पकडून आणल्यावर त्यांना गडावर कोंडून ठेवण्यास व प्रवेशद्वार बाहेरून बंद करण्यास आदेशिलें, परंतु दुसरे दिवशी सकाळी सोनाजींना गुरांना रानांत चारण्यास नेतांना त्या अधिकाऱ्यांनी पाहिलें. तेव्हां त्यांस मोठें आश्चर्य वाटलें. तो घोड्यावरून खाली उतरला व त्याने सोनाजी महाराजांपुढे लोटांगण घातलें व विनंति केली की, काल मी उगाच आपणास गडावर कोंडून त्रास दिला, तरी मला आपण या अपराधाची क्षमा करावी.

सोनाजी महाराजांनी उत्तर दिलें, 'तुमचें कर्तव्य तुम्ही केलें यांत तुमचा काय अपराध? देवाने मला दरवाज्यांतून बाहेर काढलें. तुम्ही मनांत कांही न ठेवता, आपल्या कामास जावें, माझा तुमच्यावर कांही राग नाही.' ह्या अधिकाऱ्याने गांवांत जाऊन देशपांडे, देशमुख लोकांना महाराजांच्य दैवी सामर्थ्याची माहिती सांगितली, तेव्हां सर्व मंडळीस त्यांचेसंबंधी आदर वाटू लागला.

## भुजंगाचा दंश

एकदा चैत्र महिन्यांत उन्हाचे वेळी दुपारी सोनाजी महाराजांनी तलावावर गुराना पाणी पाजून एका मोठ्या वडाच्या झाडाखाली छायेंत बसविलें व स्वत:हि पडून राहिलें. एका भुजंगाने येऊन त्यांच्या पायास दंश केला. पायांतून रक्त वाहूं लागलें. जवळच मोट चालविणाऱ्या इसमाने हें दृश्य पाहून मांत्रिक व माणसे जमवून मंत्रोपचार सुरू केला. कांहीं लोक भुजंगास मारण्यास पुढे झाले. तेव्हां महाराजांनी सांगितलें की, त्याला मारू नका, त्यांने तुमचें काय नुकसान केलें आहे ? नंतर त्यांनी

भुजंगास जा म्हणून सांगताच तो निघून गेला. मग सोनाजी महाराज गुरें घेऊन रक्ताच्या पायाने घरीं गेले. यामुळे लोक त्यांना अवतारी पुरुष म्हणूं लागले.

**सोनाजी–मठाची स्थापना**

अशा प्रकारे लोकांत सोनाजी महाराजांची कीर्ति पसरूं लागल्यावर दूरदूरचे लोक त्यांच्या दर्शनास येऊन आपलें संकट दूर करण्यास त्यांना विनवूं लागलें, तेव्हां मामाने त्याना गुरें चारण्यास नेण्याचे काम करण्यास मना केलें. गांवाजवळ जागा पाहून त्यांना राहण्यास लोकांनी घर बांधून दिलें, त्यांचे जवळ इतरांनीहि घरें बांधून ते त्यांच्या सहवासात भक्ति–उपासना करूं लागले.

गांवोगावचे लोक दर्शनास येऊन धान्य वगैरे देऊं लागले. तेव्हां त्यांनी कार्तिकी उत्सव करण्यास सुरुवात केली. पालखीत देवाची मूर्ति ठेऊन भजनी–दिंडचांसह मिरवण्यांत येई. मग गोपालकाला, प्रसाद व भंडारा होई. यावेळी भाकरी, मिसळीचें वरण व अंबाडीची भाजी प्रसाद म्हणून हजारों माणसांना देण्यात येई. पुढें एक मोठा रथ तयार करण्यांत व त्याची मिरवणूक काढण्यांत येऊं लागली. हा उत्सव आताही सोनाळा येथे दरवर्षी होतो. रथ होईपर्यंत गाडचावर मखर बांधून व त्यांत रुक्मिणीवर पांडुरंगाची मूर्ति ठेवण्यांत येई व मिरवणूक निघे.

उत्सवानंतर सोनाजी महाराज गांवोगांवी भजनी मंडळीसह जात व तेथेहि भजनें कीर्तनें, भंडारे आदि उत्सवपूर्वक करण्यांत येत असत.

सोनाजी शरीराने धट्टेकट्टे असून डोक्यास पांढरें पागोटे, नेसण्यास खादी व अंगावर घोंगडे असा असे. आणि रहणी कुणब्याप्रमाणे साधी असे.

**धान्याच्या पेवांतील घूस काढली**

एकदां सोनाळचाचे सीताराम पोळ परगांवी गेले होते. त्यांचे येथे पेवांत (कणगीत) धान्य भरलेले होते. पेवांची तोंडें मातीने लिंपलीं होती. हें कळल्याने सोनाजी त्यांचेकडे गेले. घरांत पोळ यांची साध्वी स्त्री होती. तिला त्यांनी सांगितलें की, पेवांत घूस माती उंकरीत आहे; तिला बाहेर काढण्यास मी आलो आहे. तिने संमति देताच पेवावरील मातीचें लिंपन काढून त्यांनी पेवांत उडी मारली व घोंगडींत घूस धरून बाहेर काढली व दूर सोडून दिली. घुशीने पाडलेलें दार बुजवून टाकलें.

**सोनाजीची संतति**

सोनाजीला पुंडलीक व नामदेव असे दोन पुत्र होते. दहाव्या वर्षी त्यांचीं लग्नें करण्यांत आलीं दोघेहि भक्तिमार्गी होते.

**नागपूरला सोनाजीची भेट**

फिरत फिरत एकदा सोनाजी महाराज नागपूरला आले. चिटनवीसांच्या वाडचा–जवळील सोनाजी वाडींत त्यांचा मुक्काम होता. तिसरे रघूजी भोसले हे यावेळी गादीवर असून त्यांचे मोठें वैभव होतें, यावेळी त्यांना नवज्वर झाला. (श्री. दातार

यांचे चरित्रांत राजे रघूजीचे पुत्र यशवंतराव आजारी पडले होते व सोनाजी महाराजांना सोनाळा येथे माणसें पाठवून बोलाविलें होते असें लिहिलें आहे.) मोठमोठ्या वैद्यांच्या उपचारांनीहि त्यांना गुण आला नाही. तेव्हा दरबारच्या मंडळींनीं सांगितलें की, संत सोनाजी महाराज साक्षात्कारी आहेत, त्यानी अनेक चमत्कार केले आहेत. त्यांना प्रकृति दाखवावी सोनाजी महाराजांकडे दरबारच्या मंडळीनी जाऊन विनविलें की, रघूजी राजावर कृपा करावी. तेव्हां सोनाजी महाराजांनी प्रसाद म्हणून भाकरी व अंबाडीची भाजी पाठविली व तो प्रसाद भक्षण करण्यास सांगितलें.

राजेसाहेबांनी प्रसाद भक्तीने सेवन केला तेव्हा त्यांस बरें वाटलें व ज्वरहि उतरला. उठूंबसूं लागल्यावर राजेसाहेब महाराजांचें दर्शनास आले. महाराजांनी या स्थानींहि भंडारे केले. हा काळ १८५२-५३ चा असावा.

### टेकडीवर देवीची स्थापना

आतां महाराजांची कीर्ति दूरवर पसरली, यामुळे लांबलांबचे लोक संसारिक कामना ठेवून त्यांच्या दर्शनास येऊं लागले. पण यामुळे हरिभक्तींत व्यत्यय येतो, म्हणून एका निःस्पृह साधूसह ते जवळच रानांत गेले व एका डोंगरात उंच जागी एका पाषाणास शेंदूर लावून त्याची देवी म्हणून स्थापना केली. जवळच चंद्रभागा आहे. साधूला महाराजांनी सांगितलें की, तू येथे राहा आणि जे भाविक लोक येतील त्यांस चंद्रभागेचें स्नान करून देवीचें दर्शन घेण्यास सांग. त्यांना देवीचा अंगारा देऊन त्यांच्या अंगावरून मोरपंखाची झाडणी फिरवीत जा म्हणजे त्यांच्या कामना पूर्ण होतील. (शहरापासून ७ मैलांवर कोराडीची देवी आहे. तिची स्थापना सोनाजीमहाराजांनी केली नसेलना अशी शंका आहे).

### जगन्नाथ व त्रिस्थळीची यात्रा

राजे साहेबांच्या एका आप्ताला समंधबाधा झाली होती. महाराजांच्या कृपावलोकनाने ही कमी झाली. त्याला महाराजांनी यात्रा करण्यास सांगितलें. महाराज नागपूरहून जगन्नाथाच्या यात्रेस निघाले. त्यांच्यासह तो आप्तही गेला. नंतर काशी, प्रयाग, गया ही त्रिस्थळी यात्राहि त्यांनी केली. यात्रेवरून महाराज मंडळीसह परत आले तेव्हा राजे रघूजी महाराजांनी सामोरे जाऊन त्यांचे स्वागत केलें. नंतर भानोरे (बहुधा भंडारा जिल्हा स्थान) येथें एक मोठा रथ तयार करविण्यांत आला, हा रथ ५०० पुरुषांकडूनहि हालणें कठिण. परंतु जमलेल्या कांहीं स्त्रियांकडून महाराजांनी हा रथ लीलेने ओढविला. यावेळी राजेसाहेबहि दरबारी मंडळीसहित तेथें उत्सवास आले होते. सोनाजी महाराज भजनांत तल्लीन होऊन नाचत होते. हें दृश्य पाहून राजे साहेबहि भारावून गेले.

### सोनाळ्याचा दुसरा रथ

सोनाळा येथील रथ एकाएकी जळाला तेव्हां कारागीर बोलावून दुसरा रथ तयार करविला आणि कार्तिकाचा उत्सव यथापूर्व उत्साहाने पार पडला.

## महारोग दूर झाला

एकदा महाराज भक्तगणासह बसले असता एक मनुष्य पेढ्यांचे ताट घेऊन आला व महाराज व इतरांना एकेक पेढा देऊं लागला. महाराजांनी जवळच्या लोकांस विचारलें की, हा मनुष्य कोण? कोणी त्याला ओळखीत नव्हते म्हणून त्यालाच विचारलें. त्याने सांगितलें की, मला महारोग झाला होता. तो महाराजांच्या कृपेने बरा झाल्यास ५ रु. चे पेढे वाटीन असा नवस केला होता, तो नवस फेडण्यास मी आलो आहे. महाराजांनी पेढा खातांच त्यांच्या पायावर कोड फुटलें.

## पाटिलाला पुत्रलाभ

यात्रेतील एका मुक्कामावर एक पाटील सहकुटुंब तीन महिन्यांच्या मुलासह महाराजांच्या दर्शनास आला. मुलाला महाराजांच्या पायावर टाकून त्याने त्याचें नामकरण करण्याची त्यांना विनंती केली. आपल्या कृपेने हें मूल झालें असल्याने आपल्या दर्शनास आलो असेंहि तो म्हणाला, तेव्हा सर्वांना आनंद होऊन अंगावरील वस्त्राचा पाळणा करून त्यांत मुलाला घातलें व त्याचें गोविंद नांव ठेविलें. स्त्रियांनी गाणीं म्हटलीं नंतर सर्वांना साखर वाटण्यांत आली. आश्चर्य हे की, असंख्य लोकांना महाराज साखर वाटत असता साखरेचें ताट भरलेलें राही परंतु इतर वाटत असतां ती संपून जात असे.

महाराजांचा रक्तपितीचा त्रास वाढू लागला. त्यांना वृद्धावस्था प्राप्त झाली. यावेळी महाराज उत्तरापेठ येथें होते. सोनाळ्याचे लोक महाराजांस भेटण्यास आले व महाराजांना सोनाळ्यास परत आणलें. कार्तिक जवळ आल्याने लोकांनी उत्सवासाठी बरेंच धान्य जमविलें होते. सर्वांसह सोनाळ्यास परत येत असता वाटेंतील ययास्विनी नदीला पूर आला होता. नदींतून जातांना धान्य भिजेल ही चिंता लोकांनी दर्शविली. पण महाराज पाण्यांत शिरतांच पाणी गुडघाभर राहिलें व सर्वजण धान्यासह दुसऱ्या तीराला सुखरूप पोंचले.

एका ब्राह्मणाला समंधपीडा होती तो महाराजांकडे आला. त्यांनी कृपादृष्टीने पाहतांच त्याची बाधा दूर झाली.

## महानिर्वाण

आता सोनाजी महाराजांना परलोक साधण्याची उत्कंठा लागली. मार्गशीर्ष शु. ११ पासून त्यांनी गांवाबाहेर एका मोकळ्या स्थानी बसून समाधि लावली व सर्वांना विठ्ठल नामस्मरणाचा सप्ताह करण्यास सांगितलें. सातवें दिवशी आरती नंतर मी प्रयाण करीन असेंहि त्यांनी सांगितलें. सात दिवस अखंड नामसप्ताह चालू होता. मार्गशीर्ष वद्य ४ ला मध्यान्ही त्यांनी महासमाधि घेतली.

जवळच जागा खणली असतां रेती लागून पाण्याची धार सुरूं झाली जणू त्यांच्या अंत्यस्नानासाठी भागीरथीच अवतीर्ण झाली. स्नानानंतर धार लुप्त झाली. नंतर सर्व गांवांत मिरवून त्यांचा देह परत त्या ठिकाणी आणला गेला. व एक खड्डा खणून त्यांत देह ठेवून तो मिठाने भरण्यांत आला. येथेच पुढे सोनाजी महाराजांची समाधि व मंदिर बांधण्यांत आले. दर वर्षी येथे उत्सव व यात्रा भरते.

### प्रकाशित चरित्र–ग्रंथांतील कांहीं विशेष

श्री. वा. वि. दातार वकील यांनी लिहिलेल्या चरित्रांत त्यांनी जे कांही अन्य चमत्कार दिलें आहेत त्यांत त्यांनी पाण्यांत भिजविलेली वात जाळली, मातीचें सोने केलें, शेतांतील कणसें गुरें व पक्षांनी खाल्ली असतांहि बरेच पीक आलें, त्यांनी बाजारांतून आणलेला जिन्नस अधिक काळपर्यंत पुरत असे. असे कांही चमत्कार आहेत.

सोनाळयाच्या सोनाजी महाराजांच्या समाधीचें भक्तीने दर्शन-पूजन करणाऱ्यांना महाराजांच्या कृपेचा लाभ होतो, असा अनेकांचा अनुभव आहे.

सोनाळा येथील लक्ष्मण नांवाचा एक मुलगा डोळ्याचा विकार होऊन अंध झाला होता. दुसऱ्या मुलाला घेऊन तो रोज समाधीचें दर्शन घेऊन तीर्थ अंगारा घेत असे. कांहीं दिवसांनी त्याला दिसूं लागलें व नंतर तो एकटाच दर्शनास येऊं लागला.

एक महारोगी महाराजांच्या समाधिजवळ येऊन राहिला. तो मधुकरीचें अन्न जेवी, आणि तीर्थ व अंगारा शरीराला लावी. कांही काळाने तो बरा झाला.

पिंपळी जहागीरचा झांगो पाटील सोनाळा येथे राहण्यास आला. त्याला फक्त एक मुलगी होती. वय ६० चे झाल्याने पुत्राभावी त्यांने समाधीची सेवा सुरू केली. महाराजांनी त्याला स्वप्नांत येऊन आदेश दिला कीं, रथ जीर्ण झाला आहे तो नवीन तयार करून दे म्हणजे पुत्रलाभ होईल. पाटिलाने कारागीर व सुतार लावून ४००० रु. खर्च करून सुंदर रथ बनविला. त्याच्या मुलीचें लग्न सहज जुळून येऊन नंतर त्याला पुत्रलाभहि झाला. ही सन १९१६ मधील घटना आहे.

योगबलाने एकदा महाराजांनी पंढरीस जाऊन दर्शन करून आल्याचीं प्रचीति लोकांना आणून दिली. तसेच पुरंदर येथे असता राउळांत एका खांबाला आग लागली हें कळतांच योगबलाने तेथे जाऊन त्यांनी ती आग विझविली.


## साई भक्तांस सुवर्णसंधी

श्री साई बाबा संस्थान, शिरडी येथे भक्तांनी देणगी म्हणून दिलेल्या सोन्याच्या दागिन्य चा लिलाव **शनिवार दिनांक १५ डिसेंबर १९७३** ला दुपारी ३ वाजता **साई निकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई ४०००१४** येथे होणार आहे. तरी सर्व साई भक्तांनो ह्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा अशी त्यांस विनंती करण्यात येत आहे

# अनंतता

निवेदक–चिपळूणकर गुरुजी

**(गुरुदेव विनोद यांच्या अनंततेवरील अभंगांचे विवेचन.)**

**पुन्हापुन्हा यावे, तुझ्या घरट्याकडे**
**परी न सापडे, जीव माझा**
**कुठेसा तेथेच, ठेविला आहे मी**
**मागल्याच जन्मी, असे वाटे**

**(अ. सं. पृ.३३)**

गुरुदेव म्हणतात की, अनंततेच्या सांगाती माझा जीव जणु माझ्याहून वेगळा होऊन मोक्षाप्रत गेलेला आहे परंतु या जगात मृत्युलोकावर या अनंततेची अनंत गूढे उकलण्याकरिता, या विश्वात भरलेले विलक्षण चमत्कार पाहण्याकरिता मला वाटत होतं की, पुन्हा पुन्हा मूलतःच जे अनंततेचे घरटे मानले आहे तेथून परत येण्याकरिता माझा देह माझ्या जिवाचा शोध करीत होता. कारण भगवान् श्रीकृष्णाने भगवद्गीतेत अ. ८ श्लोक २५ मध्ये, "धूमो रात्रिस्थता.........योगि प्राप्य निवर्तते" असे म्हटल्याप्रमाणे माझा जीव या मृत्युलोकावर येण्यास आतुर आहे, योग्य आहे कारण त्याला असे वाटते आहे की, मोक्षधामात चिरकाल राहण्यापेक्षा या मृत्युलोकावर येऊन व तेही भगवद्गीता अ. ६ श्लोक ४३–" तत्र तं बुद्धिसंयोगं .......संसिद्धौ कुरुनन्दन" या भगवंताच्या उक्तिप्रमाणे पुन्हा पुन्हा येथे येऊन पुन्हा पुन्हा अतर्क्य अनंततेचे विलक्षण वैचित्र्य नव्या नव्या मार्गांने शोधून पुन्हा परमेश्वराप्रत जाणे यातच खरी मौज आहे आणि म्हणून मला असे वाटते की, मागल्या जन्मी केव्हा तरी तेथे आलो असताना माझा जीव मी तेथेच कोठेतरी ठेवला आहे आणि आज तोच मला त्याच्या पूर्वाभ्यासासहित नवीन संशोधनाकरिता पाहिजे आहे व तो मला मिळायलाच हवा !

## प्रेमवेडी राधा

बांसरीचा सूर पडताच कानी
बावरते मनी - वेडीराधा ॥१॥
प्रेमवेडी राधा घडा उचलते
यमुनेला जाते - लगबग ॥२॥
राधेला येतांना पाहून मोहन
गंमत म्हणून - लपतसे ॥३॥
परि न दिसता राधिकेस हरी
होतसे बावरी - वेडी राधा ॥४॥
दमली राधिका शोधून शोधून
दिसता मोहन - आनंदते ॥५॥

—रमेश डी. चव्हाण
नवापूर जि. धुळें

## तुळशी वृंदावन

तुळशीच्या वृंदावनी
लावियली सांजवात
दिव्य ज्योत प्रकाशली
आज माझ्या परसात

तुळशीचे वृंदावन
मांगल्याची असे खाण
भावसुमने वाहुनी
पूजिते राधामोहन
तुळशीच्या वृंदावनी
दरवळला सुगंध
नकळत ओठातुनि
उमटले भावगीत

—रमेश डी. चव्हाण
गुजर लेन, नवापूर जि. धुळें

# स्वामी रामतीर्थ

ले : **दि. अ. घैसास**

गेल्या शतकांत भारतांतील पौर्वात्य सनातन धर्मतत्त्वे व युरोप अमेरिकेतील नव्या वंशाच्या जोमदार पाश्चात्य विचारपरंपरा यांची परस्परांशी ओळख करून संपूर्ण आर्य मूलवंशाच्या आध्यात्मिक ज्ञानाची ठेव पाश्चात्यांना खुली करण्याचे कार्य ईश्वरी योजनेनुसार करण्यासाठीं निरनिराळे लोकोत्तर जीवात्मे भारतांत जन्म घेऊन उदयास आले. पूर्व-पश्चिम सांधण्याचे हें कार्य सुमारे शतकभर चालले, व अजूनही पुढे चालणार आहे. त्या कार्याच्या बिनीच्या तुकडीतील देशभक्त, प्रखर ज्ञाननिष्ठ व कर्मनिष्ठ म्हणून स्वामी रामतीर्थ यांचे नांव साऱ्या भारतभर प्रसिद्ध आहे. विवेकानंदांचे हे समकालीन, पण त्यांच्यापेक्षाही आधी त्यांनी पाश्चात्य देशांत भारतीय तत्त्वज्ञान व धर्म यांच्याबद्दल सादर जिज्ञासा निर्माण केली होती. त्यांचा जन्म 'मुरलीवाला' नांवांच्या एका पंजाबी खेडयांत १८७३ मध्यें झाला. चालू १९७३ वर्ष हें त्यांचे जन्मशताब्दीचे वर्ष आहे. स्वामी रामतीर्थ यांचे मूळ नांव तीर्थराम गुंसाई. त्यांचे आयुष्य केवळ ३३ वर्षांचे ! १९०६ मध्यें त्यांना तेहरी गढवाल येथें अपघाती मृत्यु येऊन त्यांनी आपली इहलोकींची यात्रा संपविली. पण "मुहूर्तं ज्वलितुं श्रेयो न च धूमायितुं चिरम् ॥" या म्हणीप्रमाणे त्या अल्पावधींत देशभक्तीची तीव्र प्रेरणा भारतवासीयांना देऊन ते विजेसारखे चमकून गेले. 'जीनियस्' या सदरांत जगांतले जे काही थोडे लोक गणले जातात त्यांत स्वामींच्या समावेश होतो.

त्यांच्या जन्मानंतर थोडयाच दिवसांत त्यांची आई निवर्तली. त्यांचे वडील गरीब भिक्षुक होते. लहानपणापासून तीर्थराम अतिशय हुशार. त्यांच्या वडिलांची सांपत्तिक स्थिती फारच वाईट होती. तरीपण एकामागून एक स्कॉलरशिप्स मिळवून तीर्थरामानें शाळेंतले व कॉलेजचें शिक्षण एम.ए. पर्यंत पूर्ण केले. त्यांची प्रतिभा व स्मरणशक्ति विलक्षण जबर होती. शाळेंत असतांनाच त्यांचे पार्शियन भाषेवर प्रभुत्व होते. गणित, संस्कृत व इंग्रजी ह्यात ते अत्यंत पारंगत होते. ते जेव्हां बी.ए.च्या परीक्षेला बसले तेव्हां गणिताची प्रश्नपत्रिका फार अवघड होती. १३ पैकीं ९ प्रश्नांची उत्तरे लिहावयाची होतीं. कित्येक हुशार मुलांचा धुव्वा उडाला. पण तीर्थरामने १३ चे १३ प्रश्न सोडविले व कोणत्याही ९ उत्तरांना मार्क द्यावेत असा शेरा मारून पेपर्स सुपूर्द केले !

स्कॉलरशिप्सच्या बळावरच त्यांनी शिक्षण पुरें केलें; पण त्या पैशांचाही विनियोग पुस्तकें विकत घेणें, इतर गरीब विद्यार्थ्यांना मदत करणें अशासाठी होई. दिव्यासाठीं तेल आणायाला पैसे वापरले तर जेवणाला रामराम म्हणावा लागे अशी परिस्थिती होती. दारिद्र्याचा त्यांच्या प्रकृतीवरही वाईट परिणाम झाला तरी कडक

नियमबद्ध जीवन जगून त्यांनी नंतर आपली प्रकृति ठणठणीत केली. ४०-मैल लांब-पर्यंत हिमालयीन प्रदेशांत सहज म्हणून ते रपेट करायला जात. अमेरिकेंत ते जेव्हां गेले तेव्हां तेथेंही पळण्याच्या शर्यतीत त्यांनी अमेरिकन स्पर्धकांना हरविलें !

शालेय व कॉलेजमधील त्यांचा दिनक्रम सकाळीं ५ ते रात्रीं १०-३० असा मिनिट -मिनिट आखलेला असे. त्यांनीं लिहिलेली हजारों पत्रें सुदैवाने उपलब्ध असल्यामुळें त्यांच्या दैनंदिन जीवानाची चांगली माहिती उपलब्ध आहे. दिवसभर त्यांचा मेंदू काम करीतच असे पण ते झोपेंतही अंतर्मनानें कठीण प्रश्न सोडवीत व मध्यें जागे होऊन कागदावर उत्तरे लिहून ठेवीत. ते सतत कसलाना कसला विचार करीत असत किंवा काम करीत असत. डंबेल्स किंवा वजनें यांच्या ऐवजीं आपल्या खाटेचे पाय आपल्या दोन पायांनी वर उचलण्यासारखे खास व्यायाम प्रकार त्यानी शोधून काढले होते. " आपलें पोट ठीक असलें कीं कामांत जास्त लक्ष लागतें व मेंदू तल्लख रहातो. थोडे खावें व तें नीट पचवावें असें मी करतों " असे त्यांनी एका पत्रांत लिहिले आहे. त्यांची वाचनाची भूक मात्र फार दांडगी असे. पण वाचीत तें तें आत्मसात् करीत असत. शास्त्र व साहित्य या दोन्ही विषयांत त्यांची बुद्धि सारखीच कुशाग्रतेनें चालत असे. पौर्वात्य व पाश्चात्य दोन्ही तत्त्वज्ञानें त्यांनीं आत्मसात् केली होती. अमेरिकेंत ते जेव्हां व्याख्यानें देत होते तेव्हां लाला हरदयाळ तेथें होते. त्यांच्याविषयीं लालांचे मत असें-अमेरिकेंत आलेल्या हिंदु लोकांत सर्वश्रेष्ठ, उच्च कोटीचे संत, हिंदु आध्यात्मिकतेचा आदर्श असें जीवन, विश्वकुटुंबभाव तर अंगीं मुरलेला ! असे हे स्वामी रामतीर्थ म्हणजे एक असामान्य साधु आहेत " जपानमधील त्यांच्या व्याख्यानांचा " तेथील लोकांवर जो प्रभाव पडला त्याचें वर्णन करतांना पूरणसिंग यांनी म्हटलें–जपानी लोकांना स्वामी रामतीर्थ म्हणजे मानवी देह धारण केलेला फूजीसान पर्वतच वाटला, गौतम बुद्धच पुन: अवतरले आहेत असे वाटले." स्वामीजींची भाषा सरळ, ओजस्वी, प्रभावी आणि उदाहरणें व दृष्टांतांनी भरलेली असे. 'यशाचे रहस्य' व "अमेरिकेतील लोकांना भारतीयांचे आवाहन" ही त्यांचीं टोकियो व सॅन्फ्रान्सिस्को येथील व्याख्यानें फारच गाजलीं.

रामतीर्थांच्या दृष्टिकोणातून यशाचे रहस्य (१) काम (२) स्वावलंबन (३) निस्वार्थीपणा (४) सर्वांभूतीं प्रेम (५) उत्साहीपणा व (६) पूर्ण निर्भयता या सहा गुणात अनुस्यूत असतें. यशाचे मर्म त्यांच्या एकाच शब्दांत सांगायचे म्हणजे "स्वावलंबन."

स्वत:बद्दल स्वामी कधीं " मी " असे म्हणत नसत. " रामचे असें सांगणे आहे," " राम असे म्हणतो " असे ते स्वत:बद्दल त्रयस्थाच्या भूमिकेतून बोलायचे. भारताला पुन्हा: पूर्वीचे वैभव १०-२० वर्षांत प्राप्त होईल असे ते मोठ्या आत्मविश्वासाने म्हणत. स्वामी नुसते गूढ ध्येयवादी नव्हते. भारताच्या पुनरुत्थानाची त्यांना तीव्र तळमळ असे व व्यवहार्य अशा उन्नतीच्या योजना त्यांच्याजवळ होत्या. प्रथम आपल्या मातृ-

भूमीशीं मनानें एकात्म होऊन देशभक्तीच्या ऊर्मींनी हृदय स्पंदन पावूं लागले तरच पुढें विश्वव्यापी जगदीशाबद्दल आत्मीयता वाटूं शकेल. देशाचे हित हे इतर गौण स्थानिक हितांपेक्षां श्रेष्ठ! मोठ्या लोकांच्या संकुचित विचारांनी देश सबळ होत नाहीं, महान विचारांच्या लहान माणसांनींच तो सामर्थ्यशाली होतो असे त्यांचे म्हणणे असे. हिमालयाशीं आपला आध्यात्मिक संबंध असला तरी व्यवहारांत पाश्चात्यांशीं संबंध आहे. त्यांच्यासह पृथ्वीवर नांदायचे आहे. टीकेपेक्षां गुणग्राहकता बरी; बंधुभाव, एकी व सहकार्य श्रेष्ठ. श्रमांची किंमत करणें फार आवश्यक; बायका, मुलें व श्रमिक यांच्या शिक्षणाची आबाळ म्हणजे भारतीयांच्या सामर्थ्याच्या मुळावर घाव घालणेंच आहे. जातीयतेची बांडगुळें मोकळ्या वातावरणांतील शिक्षणाने, समंजसपणाने, ज्ञानाने आणि शास्त्रीय विचारांना प्राधान्य देण्यानें तोडून टाकतां येतील, असें त्यांना वाटे. खरे शिक्षण देशाच्या साधनस्त्रोतांचा उपयोग करण्याच्या दृष्टीनें मिळाले पाहिजे. चांगल्या शिक्षणाचा परिणाम म्हणून लोकांना जमिनींतून जास्त पीक काढतां आलें पाहिजे, खाणींतून अधिक खनिजें निघालीं पाहिजेत, धंद्यांतील उत्पादन वाढलें पाहिजे, लोकांचीं शरीरें निकोप व कार्यक्षम झाली पाहिजेत, मने अभिजात विचारप्रवण असली पाहिजेत, हृदयें अधिक शुद्ध व उद्योगधंदेही विविधतेने भरलेले हवेत. राष्ट्रांत ऐक्यभावना उत्पन्न होईल तेच खरे शिक्षण. खरा देशभक्त देशासाठीं सर्वस्व समर्पण करणारा पाहिजे. देशाशीं त्याचे अस्तित्व मिसळून गेले पाहिजे, धडधाकट व्हा, लोकही तुमचा कित्ता गिरवतील. चालूं लागा–लोक संगतीला येतील; तुमची शक्तीच देशाच्या शरीरांतून प्रतिस्पंदित होऊं लागेल असा त्यांचा तरुणांसाठी संदेश असे. भारत जगावासा वाटत असला तर स्वतःपासून कार्याला सुरुवात करा. आपल्या प्रांतांत एकही निरक्षर स्त्री व कामगार राहूं देऊं नका. जसें अनुभूत होतें तसेंच बोला, तसेच लिहा. खोटी शैली संपादन करूं नका. आपल्या अंगणांतील झाडूवाल्याला चार अक्षरें शिकविण्याची तुम्हांला लाज वाटत असली तर थू:तुमच्या शिक्षणावर आणि नीतीवर! असे उद्गार ते काढीत असत.

आपल्या देशाशीं त्यांची भावनात्मक एकरूपता विलक्षण होती. ते म्हणायचे "मी भारतच आहे असें मला वाटूं दे, या देशाची भूमि म्हणजे माझें शरीर आहे. कन्या कुमारी ही माझी पावले तर हिमालय हे माझे मस्तक आहे. माझ्या केसांतून गंगा वहात आहे, माझ्या दोन्ही खांद्यांवरून सिंधु व ब्रह्मपुत्रा या नद्या वहात आहेत. माझ्या कमरेभोवती विंध्याचलाची मेखला आहे. दक्षिणेकडील दोन्ही घाट हे माझे दोन पाय आहेत. पूर्व व पश्चिम सीमा हे माझे हात आहेत. ते हात अखिल मानवजातीला प्रेमाने आलिंगन देत आहेत. मी अनंतांत पहात आहे. माझा अंतरात्मा लोकांशी मिसळून गेला आहे! मी चालतो तेव्हा मला वाटतं भरतखंडच चालत आहे. मी श्वास घेतों तेव्हां वाटतं, देशच श्वास घेत आहे. माझ्या शब्दांतून भारताची वाणी उमटत आहे, हाच माझा वेदांत, हीच माझी आध्यात्मिकता." असे ते म्हणत.

"या रामाला कृष्ण जेवढा प्रिय तेवढाच खिस्तही प्रिय, शंकराचार्य जेवढे आवडते तेवढेच भगवान् बुद्धही आवडते. हा राम जेवढा भारतीय आहे तेवढाच अमेरिकन आहे. राम कोणत्याहि संप्रदायाचा कैदी नाही. हा राम तुमचा आहे, सगळ्या पृथ्वीचा आहे. सत्य तुमचेंच आहे" "सत्यासाठीं हुतात्मे होणारे लोक पाहिजेत! खरेखुरे कार्यकर्ते! भिकाऱ्यांबरोबर उघड्यावर रहाण्याची नि अर्धीमुर्धी शिळी भाकर खाऊन रहाण्याची तयारी असलेले ज़ातिवंत देशभक्त मला पाहिजेत. या कार्यांत देव साह्य करतो. एखाद्या माणसाचा अभ्युदय व्हावा म्हणून तुम्ही ज़र खटपट केलीत तर त्यांत पर्यायाने तुमचाही उत्कर्ष होत असतो हा अनुभव आहे!" अशा तऱ्हेने त्यांनी आपली विचारसरणी मांडली. गरिबांच्या रूपांत तुम्हांला दानत शिकवायला ईश्वरच तुमच्यापुढें हजर असतो तेव्हां त्यांना सहाय्य करण्याची संधि घालवूं नका.

"आपण आपल्या कर्मांत जगतों, दिवस कंठणे म्हणजे जीवन नव्हे. विचार व कर्म हें जीवन; श्वासांची येजा म्हणजे जीवन नव्हे. भावनांनी जगतो, घड्याळाच्या काट्यानुसार नाही. ज्याचे विचार, भावना व कृति उदात्त तोच खरा जिवंत माणूस. म्हणून स्वकर्म हीच सेवा, हीच पूजा; कर्म हेंच जीवन, म्हणून कर्म करीत रहा; कर्म हाच परमेश्वर व स्वावलंबन हाच धर्म. प्रार्थनेच्यापेक्षा, देवाने दिलेल्या बुद्धी-शक्तीचा सदुपयोग करून जीवन उज्ज्वल करा; सूर्य उगवला की चराचर जसें आपल्या कर्मांत उद्युक्त होतें तसें तुम्ही दिव्य व उच्च कर्म करणारे आध्यात्मिक सूर्य व्हा. तुमची कृति हीच दुसऱ्यांची स्फूर्ति!"

स्वामी विवेकानंदांनी रामतीर्थांना "गरिबांसाठीं व दुःखितांसाठीं ज्याचे हृद द्रवते असा महात्मा" अशा शब्दात गौरविले आहे. महात्मा गांधींनी म्हटले आहे- "स्वामी रामतीर्थांच्या शिकवणुकीचा प्रचार अधिक झाला पाहिजे. ते भारता-पुरतेच नव्हे तर सर्व जगाचे एक देदीप्यमान् महात्मा होते. त्यांचीं ध्येयें मला चिर आदरणीय वाटतात."

अजूनही पंजाबांतील जुन्या पिढीतल्या माणसांच्या कानी स्वामी रामतीर्थांचे नांव पडलें कीं त्याच्या अंगावर रोमांच उभे रहातात. त्यांच्या प्रखर देशभक्तीचा वृद्धांच्या मनावर अजून कायम ठसा आहे. नव्या पिढीला त्यांचे ग्रंथ व विचार अत्यंत स्फूर्ति-दायक ठरतील. स्वामी रामतीर्थ हे ज्या महान् पुरुषांच्या मालिकेंतील एक मणि होते. त्या देशभक्तांच्या मालिकेला स्मृतिपूर्वक प्रणाम! शंभर वर्षांपूर्वीच्या भारताला आजचा भारत प्रणाम करीत आहे. पुढील शतकभरांत भारताच्या वैभवाचीं देश-भक्तांनीं उराशीं बाळगलेलीं स्वप्नें प्रत्यक्षांत उतरणार काय?

(स्वामी रामतीर्थ जन्मशताब्दीच्या निमित्तानें)

# श्रीसाईगीतमाला–( पुष्प ४थे )

–कवि : मधुकर जोशी

दिवाळीचा सण आला होता. साईबाबा शिरडीस दुकानदारांकडून थोडेसे तेल मागावयास गेले. पण तेथील सर्व वाण्यांनी त्यांना तेल देण्यास नकार दिला. तेलावाचून दिवे कसे जळणार ? सर्व भक्तांना चिन्ता लागली. बाबांनी थोडे तेल घेतले आणि त्यात पाणी घातले व ते पिऊन टाकले. उरलेल्या तेलामध्ये त्यांनी पाणी ओतले व ते पाणी सर्व पणत्यांत घातले. मशिदीत आणि मंदिरात ते पाण्याचे दिवे रात्रभर जळत होते– निवेदक

दिवाळी दिसे पहा नवलाची ।
पाण्याचे हे दिवे पेटती किमया ही साईंची ॥धृ०॥

मंदिर आणि मशीद दोन्ही
सुंदर दिसती लक्ष दीपांनी
चैतन्याचा प्रकाश पसरे शोभा मांगल्याची ! ॥१॥

तेलातुन त्या घालुन पाणी
साइनाथ ते घेती पिउनी
दीप लागले हरिभक्तीचे लीला सामर्थ्याची ॥२॥

दीपांत उद्‌भुत पाणी पेटे
पाण्यांतुन ह्या सत्यचि उमटे
रात्रभरी ते दिवे पाहते जनता ही शिरडीची ॥३॥

रागद्वेष ते गेले जळुनी
क्षमा मागती शरण येउनी
साईचरणीं कृतार्थ झाली सुमने ही भक्तीचीं ॥४॥

अगाध लीला श्रीसाईंची
ओळख कोणा असेल त्यांची
ईश्वरभक्ती हीच मानवी शक्ती या जन्माची ॥५॥

* * *

# शिरडी-वृत्त सप्टेंबर १९७३

या महिन्यांत बाहेर गांवच्या भक्तांची गर्दी कमी प्रमाणांत होती. कांहीं कलाकारांनीं श्रीपुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणें :–

**कीर्तनें :–** १) संस्थान गवई श्री.ग.वि. जोशी शास्त्री यांची कीर्तनें नेहमीप्रमाणे झाली.
२) ह.भ.प. कमलाकरबुवा चोपडेकर, बीड.
३) ह.भ.प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिरडी.

**भजन :–** १) ह.भ.प. हरिश्चंद्र म. प्रासादिक भजनी मंडळ, घोडेगांव, पुणे.
२) ह.भ.प. दत्तात्रेय भजनी मंडळी, पनवेल, कुलाबा.
३) भगवान सत्यसाई सेवासमिती भजनी मंडळ, अधोल, लखनौ.
४) ह.भ.प. आनंदजी महाराज भजनी मंडळ, नागपूर.
५) ह.भ.प. नारायणस्वामी भजनी मंडळ, जबलपूर.

**गायन :–** १) अभिरुची नाट्य संस्था, लक्ष्मीनगर, पुणे.
२) श्री प्रणवकुमार चटर्जी ३) सौ. मंजूषा चटर्जी ४) कु. शाश्वती चटर्जी इन्दौर.

**सनई वादन :–** श्री. शिवाजी तुकाराम धुमाळ, म्हसवड, सातारा.

**सन्माननीय पाहुण्यांच्या भेटी :–**

१) मा. श्री. पी. सुब्रम्हण्यम्‌साहेब, जिल्हाधिकारी, अहमदनगर.
२) मा. श्री. जी. व्ही. देवसाहेब, जिल्हा न्यायाधिश, अहमदनगर.
३) मा. श्री. पी. वेदांतम्‌ डायरेक्टर ऑफ सेन्सस ऑपरेशन्स गव्हर्मेंट ऑफ आंध्रप्रदेश.
४) मा. श्री. मोडकसाहेब आय. जी. पी. महाराष्ट्र स्टेट.
५) मा. श्री. कस्तुरी रेड्डीसाहेब, जॉइन्ट डायरेक्टर ऑफ सर्वे, आंध्रप्रदेश.
६) मा. श्री. श्रीनिवास पाटील प्रांत ऑफिसरसाहेब, संगमनेर.
७) मा. श्री. सक्सेनासाहेब डेप्यु. सेक्रेटरी सचिवालय, मुंबई.
८) परमपूज्य श्री कुहीजी स्वामीमहाराज, बंगलोर.

# शिरडी-वृत्त ऑक्टोबर १९७३

## दसरा–उत्सव

या महिन्यांत श्रीसाईबाबांचा पुण्यतिथी–उत्सव आल्यामुळें व दिवाळीचा सण आल्याने संपूर्ण महिना बाहेरगांवचे भक्तांची गर्दी बरीच होती. शाळा कॉलेजांना दिवाळीची सुट्टी असल्यामुळें मुलामुलींच्या सहलीही बऱ्याच आल्या होत्या.

**दसरा उत्सव १ ला दिवसः**—शनिवार दि. ६-१०-१९७३ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५-१५ वा. काकड आरती सुरू झाली. मोठ्या संख्येने साईभक्त आरतीला उपस्थित होते. आरती संपल्यावर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरांतून गुरुस्थानमार्गे द्वाररकामाईत गेली. त्या ठिकाणीं साई सच्चरित अध्याय वाचानास सुरुवात झाली. समाधि मंदिरांत सकाळीं ६-३० वा. श्रींचे मंगलस्नान झाल्यावर नित्यकार्यक्रमाव्यतिरिक्त दुपारी ३-३० ते ५ पर्यंत ह.भ.प. डॉ. नारायणराव राजदेरकर महाराज औरंगाबाद यांचे कीर्तन झाले. सायंकाळीं ५ वा. सीमोल्लंघन मिरवणूक समाधि मंदिरांतून वाजत गाजत खंडोबाचे देवळाजवळ गेली.. मिरवणुकीला मुंबईतील सुप्रसिद्ध श्रीकृष्ण बँड पथक अग्रभागी होते. शिवाय श्रीसाईनाथ विद्यालय बँड पथक शिर्डी, राहाता येथील बँड पथक, स्थानिक वाद्यवृंद व ग्रामस्थ आणि भक्त मंडळी अशी भव्य मिरवणूक खंडोबाचे मंदिराजवळ गेल्यावर श्रींच्या निशाणाचें व शमीचें पूजन झालें व सोने लुटण्याचा कार्यक्रम झाला. धार्मिक पूजा विधी कार्यक्रम श्री. का. सी. पाठकसाहेब रिसीव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी यांचे हस्ते झाला. त्यानंतर सर्व उपस्थित लोकांनीं खंडोबा देवाचे दर्शन घेतले व मिरवणूक परत येतेवेळीं गांवातील सर्व देवळांत जाऊन देवतांचे दर्शन घेतले. सायंकाळी धूपारती झाल्यावर ७-३० ते ९ वाजे पर्यंत व ९-३० ते ११ पर्यंत सौ. नीलाक्षी जोशी (जुवेकर) मुंबई, यांचे गायन झाले. रात्रौ ९-१५ ते १२ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक वाद्यांच्या गजरांत गांवातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**दसरा उत्सव २ रा दिवसः**—रविवार दि. ७-१०-७३ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५-१५ वा. काकड आरती झाली. नंतर श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून समाधि मंदिरात आली. श्रींचे मंगलस्नान झाल्यावर नित्य-कार्यक्रमा व्यतिरिक्त सकाळी ९ वाजतां भिक्षा-झोळी कार्यक्रम झाला. गावात घरोघरी भिक्षेसाठीं गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा आरती करून भिक्षाझोळीत गहूं, तांदूळ, ज्वारी, बाजरी, फळें, नारळ, पैसे अशी भिक्षा यथाशक्ती अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळीं १० ते १२ पर्यंत श्रींचे पुण्यतिथी कीर्तन श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांनीं केले. त्यानंतर माध्यान्ह आरती, तीर्थप्रसाद वाटण्यात

आला. दुपारी १ ते ३ पर्यंत श्रींचा आराधनाविधी कार्यक्रम श्री. का. सी. पाठकसाहेब रिसीव्हर यांचे शुभहस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी ब्राह्मणांना धोतर-उपरणे व सुवासिनींना खण दिले. दुपारी ४-३० ते ६ पर्यंत प्रा. डॉ. नारायणराव राजदेरकर महाराज यांचे कीर्तन झाले. सायंकाळीं ७ ते ८ पर्यंत श्रीकृष्ण बॅण्ड पथक मुंबई यांचा बँड वादनाचा कार्यक्रम झाला. रात्रौ ९-१५ ते १२-३० पर्यंत श्रींच्या रथाची भव्य मिरवणूक गांवातून निघाली होती. सनई, चौघडा, डफ, बँड पथके, वाद्याबरोबरच भजन वगैरे कार्यक्रमही झाले. प्रतीवर्षाप्रमाणेंच पुण्याचे नकलाकार श्री. बाबूराव सांडभोर यांनीं निरनिराळे वेष धारण करून करमणुकीचे कार्यक्रम केले. त्याचप्रमाणें स्थानिक लोकांनीं भारुडगारुड कार्यक्रम केले. कोळी लोकांच्या नाचगाणे कार्यक्रमांत इतर भक्तांनीही भाग घेतला होता. अशा थाटात मिरवणूक १२-३० वा. मंदिरांत आली व भक्त मंडळींनी कलाकारांच्या गायनाचे कार्यक्रमांत भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठीं मंदिर रात्रभर खुले होते.

**दसरा उत्सव ३ रा दिवसः**—सोमवार दि. ८-१०-७३ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. गुरुस्थान ठिकाणीं सकाळीं ७-३० ते ८-३० पर्यंत रुद्राभिषेक झाला. १०-३० ते १२-१५ पर्यंत काला—कीर्तन, दहीहंडी कार्यक्रम झाला. त्यावेळीं श्री बाबूराव सांडभोर व इतर स्त्रीपुरुषांनीं फुगडी कार्यक्रम केले. दहीहंडी फुटल्यावर माध्यान्ह आरती झाली व भक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. दुपारी ४-३० ते ६-३० पर्यंत प्रा. डॉ. नारायणराव राजदेरकर महाराज यांचे कीर्तन झाले. तिन्ही दिवस कीर्तन कार्यक्रम—कथा, विनोद, पोवाडे यांनीं रंगला होता. धूपारती झाल्यावर सायंकाळीं ७ ते ८ पर्यंत श्री. लक्ष्मण बुंवा वाघचौरे शिर्डी यांचे प्रवचन झाले त्यानंतर रात्रौ ८ ते १० वाजेपर्यंत सौ. निर्मलाबाई गोगटे मुंबई यांचे गायन झाले. व शोजारती झाल्यावर उत्सव समाप्त झाला.

दसरा उत्सवाकरितां संस्थानने आयोजित केलेले श्री. सुरेश शिरगांवकर आदि स्थानिक कलाकार यांनीं सादर केलेला -दुरीताचे तिमीर जावो-या नाटकाचा कार्यक्रम उत्कृष्ट झाला.

**कोजागिरी पौर्णिमाः**—रात्रौ १० ते १२ श्रींची पूजा व चंद्रपूजा मा. रिसीव्हर श्री. का. सी. पाठकसाहेब यांचे हस्ते झाली. उपस्थित भक्त मंडळींना दूध, पोहे व प्रसाद वाटण्यात आला. तसेच डॉ. के. बी. गव्हाणकर यांचे प्रवचन झाले. नंतर त्यांच्या सहकाऱ्यांनीं भजन, गायन, वादन कार्यक्रम करून रात्रभर जागर केला.

**दिवाळी—लक्ष्मीपूजनः**—संस्थान रिसीव्हरसाहेब यांचे शुभहस्ते श्री महालक्ष्मी सरस्वतीपूजन थाटांत पार पडले. भक्त मंडळींना प्रसाद वाटण्यात आला. मुलांनी फटाके वाजवून व भूईनळे पेटवून दिवाळीचा आनंद लुटला.

**माननीयांच्या भेटीः—**

(१) मा. श्री. राणेसाहेब कलेक्टर, नरसिंगपूर (म. प्र.).
(२) मा. श्री. एस. के वानखेडेसाहेब सभापति महाराष्ट्र विधान सभा, मुंबई.
(३) मा. श्री. जी. डी. जैनसाहेब आय. ए. एस. जॉईन्ट डायरेक्टर ऑफ कर्मशिअल अॅण्ड इंडस्ट्रीअल डिपार्टमेंट न्यू दिल्ली.
(४) मा. श्री. पी. एम. वाणीसाहेब डिस्ट्रिक्ट सप्लाय ऑफिसर, धुळे.
(५) मा. श्री. एम. व्ही. देवसाहेब, रेव्हून्यू सेक्रेटरी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(६) मा. श्री. के. टी. राठोडसाहेब, राज्यमंत्री, म्हैसूर स्टेट.
(७) मा. श्री. सुब्रम्हण्य्मसाहेब, जिल्हाधिकारी, अहमदनगर.
(८) मा. श्री. पारेखसाहेब, जज्ज सिटी सिव्हील कोर्ट, मुंबई.
(९) मा. श्री. राधाकृष्ण स्वामीजी, मैलापूर, मद्रास.
(१०) मा. डॉ. देसाईसाहेब, रेव्हून्यू कमिशनर, मुंबई विभाग.

आक्टोबर १९७३ महिन्यांत व पुण्यतिथि उत्सवांत कांहीं कलाकारांनीं श्रींच्या पुढें गायन व वादन यांची हजेरी दिली त्यांची नांवें खाली नमूद केल्यामाणें आहेत:–

**कीर्तनः—**(१) संस्थान गवई श्री. ग. वि. जोशी शास्त्री यांची कीर्तनें नेहमी प्रमाणें झाली.

(२) ह. भ. प. रामराव महाराज, जि. बुलढाणा.
(३) ह. भ. प. कमलाकरबुवा चोपडेकर, जि. बीड.
(४) ह. भ. प. प्रा. डॉ. नारायणराव राजदेरकर, औरंगाबाद.

**प्रवचनः—** (१) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी.
(२) डॉ. के. बी. गव्हाणकर, मुंबई.

**भजनः—** (१) एकादशी वारकरी सांप्रदाय भजनी मंडळ भिवंडी, जि. ठाणे.
(२) श्रीमान आनंदसाई भजनी मंडळ, नागपूर.
(३) ह. भ. प. मृदुंगमणी साटमबुवा भजनी मंडळ, मुंबई.
(४) श्री. पी. एस. सुब्रम्हण्यम भजनी मंडळ, घाटकोपर, मुंबई.

**गायन, वादन नृत्य वगैरेः**–(१) श्री. रामप्रसाद सिंग लखनौ. २) श्री. श्रीराम विष्णू सातर्डेकर, मुंबई.

(३) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. (४) सौ. शरयु सा. मराठे, शिर्डी. (५) कु. मंगला ल. हिरवे मुंबई. (६) श्री. वसंतराव देवभानकर शिर्डी. (७) श्री. प्रभाकर ल. करंडे, नागपूर. (८) श्री. नारायण बा-वाडेकर, सातारा. (९) कु. मंगला ग. जोशी, शिर्डी. (१०) सौ. निला प्रभू, मुंबई. (११) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिर्डी. (१२) श्री. दिगंबर बा. नारकर, शिर्डी. (१३) श्री. रघुनाथ बा. सांडभोर, पुणे. (१४) श्री. रत्नाकर ना. कोराटे, शिर्डी. (१५) सौ. कमलाबाई. र. सांडभोर, पुणे. (१६) डॉ. कीर्तीकर मुंबई. (१७) श्री. किशोर देशपांडे, मुंबई. (१८) श्री. शंकर रा. सालकर, कोपरगांव. (१९) श्री. नौशेर खु. इराणी अ. नगर. (२०) श्री. गोविंद ना. हडकर, मालवण. (२१) श्री. नामदेव ना. भोईर, कुलाबा. (२२) श्री. बाळाभाऊ वि. गुरव, शिरडी. (२३) श्री. तानोबा वाडेकर शिर्डी. (२४) श्री. एस. के. खान, शिर्डी. (२५) कु. मणी, हैद्राबाद. (२६) श्री. ललीतकुमार दे. जोशी, शिरडी. (२७) श्री. राघू भा. सालकर, कोपरगांव. (२८) श्री. देवीदास रा. अत्रे, औरंगाबाद. (२९) सौ. नीलाक्षी जोशी (जुवेकर), मुंबई. (३०) कु. अंजली ना. राजदेरकर, औरंगाबाद. (३१) सौ. निर्मलाबाई गोगटे, मुंबई. (३२) श्री. पुरुषोत्तमराव वालावलकर, मुंबई. (३३) श्री. नागेशकर, मुंबई(३४) श्री. आप्पा सामंत, मुंबई. (३५) श्री. चंद्रकांत हडकर, मुंबई. (३६) श्री. शशीकांत पुसाळकर, मुंबई. (३७) श्री. विलास बिरजे, मुंबई. (३८) श्री. विनायक लाड, मुंबई. (३९) श्री. अनंत पांचाळ, मुंबई. (४०) श्री. वसंत गव्हाणकर, मुंबई. (४१) श्री. हरीष गव्हाणकर. (४२) श्री. रंजन गव्हाणकर. (४३) श्री. निशीकांत सामंत, मुंबई. (४४) श्री. नरेश इंदुलकर, मुंबई. (४५) श्री. विजय गव्हाणकर, मुंबई. (४६) श्री. शाहीर पांडुरंग वनमाळी, मुंबई. (४७) श्री. दयानंद सामंत, मुंबई. (४८) श्री. नरहरी रा. कविश्वर, इन्दौर. (४८) कु. उषा आजगांवकर, मुंबई. (४९) सौ. दामले मुंबई. (५०) श्री. बाळासाहेब माळवदकर, पुणे. (५१) सौ. गोदूताई देशपांडे, इन्दौर. (५२) श्री. विश्वनाथ राव, जबलपूर. (५३) कु. लीलाताई गोलतकर, मुंबई. (५४) श्री. कार्नाड गुरुदत्तराव, म्हैसूर. (५५) सौ. सुप्रिया पाटील, मुंबई.

# संतचरित्रे प्रेरक, प्रभावी नि स्फूर्तिदायक

★

## शिरडी येथें ह. भ. प. प्रा. डॉ. राजदेरकर यांची कीर्तने



**शिरडी**:–यंदाच्या दसऱ्याच्या उत्सवात श्रीसाईबाबा पुण्यतिथि महोत्सवात ह. भ. प. प्रा. डॉ. नारायणराव राजदेरकर, औरंगाबाद यांची श्रीसाईनाथ मंदिरांत तीन दिवस कीर्तने झाली. जनतेची अभिरुचि लक्षात घेऊन भिन्न भिन्न भाषांचा वापर करून प्रा. डॉ. राजदेरकर यांनी कीर्तनाद्वारे श्रोत्यांची मने आकर्षून घेतली. संतमहिमा किती थोर आहे ते त्यांनी दृष्टान्तांच्या द्वारे पटवून दिले. ते म्हणाले–प्रचीती हा संतवाङ्मयाचा आत्मा आहे. अध्यात्म हे अनुभवास येणारे शास्त्र आहे. हा अनुभव प्रत्यक्ष श्रीसाईबाबांच्या सहवासात ज्यांनी चाखला ते धन्य होत. संतचरित्रे नेहमीच प्रेरक, प्रभावी नि स्फूर्तिदायक ठरतात. सर्व संत हे एकच भाषा बोलतात कारण त्या सर्वांना एकच तत्वज्ञान सांगावयाचे आहे.

डॉ. राजदेरकर हे वनस्पती शास्त्राचे प्राध्यापक असून नामवंत कीर्तनकार आहेत. दसऱ्याच्या यात्रोत्सवांत शिरडी दरबारांत त्यांच्या कीर्तन पुष्पमालिकेतील ४०१ वे कीर्तनपुष्प गुंफले गेले. १००८ कीर्तने करण्याचा त्यांचा संकल्प असून आतापर्यंत महाराष्ट्र व इतर राज्यांतही त्यांनी अनेक ठिकाणी कीर्तनांसाठी दौरे काढले आहेत. शिरडीतील या कीर्तनाच्या वेळी कु. अंजली राजदेरकर हिने युनिव्हर्सल प्रेअर व पसायदान गाऊन दाखविले.

# श्रीसाईकृपेचा एक अनुभव

ले.:—चंद्रकांत दामोदर सामंत

नोव्हेंबर १९७२ मधील गोष्ट. मीं दरवर्षाच्या नेमाप्रमाणें माझ्या दोनतीन सहकाऱ्यांबरोबर शनिवारीं दुपारी मुंबईहून ३ वा. सुटणाऱ्या स्पेशल बसनें शिरडीस रात्रीं उशिरा पोहोंचलों. पहाटे उठून सर्वांनीं प्रार्तविधी आटोपले; मीं प्रथम स्नान उरकलें व माझ्या मित्रांना संस्थानच्या स्नानगृहाकडे स्नानासाठीं पाठविलें. स्नान करून परतताना वाटेंत अभिषेकाची तिकीटें खरीदण्याविषयीं मीं त्यांना बजावून ठेविलें होतें. इकडे मीं माझे दैनंदिन कार्यक्रम आटोपून समाधिमंदिरांत श्रीसाईबाबांच्या स्नानादिकाचा सोहळा पाहण्यांत गर्क होऊन गेलों. माझ्या मित्रांनीं आठवणीनें अभिषेकाची तिकीटें खरेदली असणार ह्याविषयीं मीं निश्चित होतों. सुमारे साडेसहाच्या सुमारास आमची मित्रमंडळी स्नान वगैरे आटोपून समाधिमंदिरांत दाखल झाली. साहजिकच मीं त्यांच्याकडे अभिषेकाच्या तिकीटांविषयीं अधीरतेने चौकशी केली. पण हाय! ते तिकीटें काढण्यास साफ विसरले होते व रविवारच्या गर्दीमुळे त्या वेळेस तिकीटें मिळण्याची आशाही नव्हती. मीं एकदम खिन्न झालों. आपला दरखेपेचा अभिषेकाचा नियम चुकणार व ह्या वेळेस अभिषेक न होतां मुंबईला परतावें लागणार ह्या विचारानें मन एकदम उदास झालें. मीं ह्या मनःस्थितींत समाधिमंदिरांतील श्रीबाबांच्या मूर्तीच्या उजव्या हाताला असलेल्या खोलीच्या दरवाजाला टेकून उभा होतों. सुमारे सात वाजले असावेत. इतक्यांत कोणीतरी मला पाठीमागून हात लावला, म्हणून मीं मागें वळून पाहिलें; तों एक अंदाजें पंधरा सोळा वर्षांचा मुलगा (गुजराथी असावा) माझ्या पाठीं उभा असलेला दिसला. त्यानें आपल्या मुठींतील दोन अभिषेकाची तिकीटें माझ्यापुढें करीत म्हटलें, "हें पाहा, आम्हांला आतांच्या सव्वासातच्या बसनें जावयाचें आहे. हीं अभिषेकाची तिकीटें तुम्ही घ्या." माझा स्वतःच्या कानांवर कांहीं क्षण विश्वासच बसेना! मीं चटकन् माझ्या सदऱ्याच्या खिशांतून एक रुपयाची नोट काढून त्याला देऊं केली. त्यानें ती स्विकारण्यास नकार दिला व घाईनें परततांना त्याचे पुढील शब्द माझ्या कानांवर आले, "मला पैसे नकोत. तुम्ही आमच्या नांवानें अभिषेक करा."

वास्तविक, मला नांवगांव माहिती नसलेल्या एका अनोळखी मुलानें "आमच्या नांवानें अभिषेक करा" असें सांगून माझ्या मनींची इच्छा पुरी करावी हा श्रीबाबांच्या कृपाप्रसादाचा चमत्कारच नव्हे काय?

* * *

# गुरुनानक गीतांजलि

## ( पुष्प ८ )

क्षत्रियकुलधर्मानुसार बाबाके यज्ञोपवीत करनेका समय आया। समारंभ में एकत्र हुये लोगों के सामने बाबा कुल पुरोहित हरदयाल से इस प्रकार कहने लगे–

सूत के इस धागे को, कैसे करूँ स्वीकार
बाँध नहीं सकते इससे, मन के पाप विकार ॥टेक॥

शूद्रों को तुम द्विज बनाते
ऊँच नीच का भेद बताते
श्रेष्ठता का गर्व जताते
इस बंधन से तो बढ़ता है मन में अहंकार ॥१॥

बलुची आकर हमले करते
देश लूटकर धन ले जाते
मनमानी वे कत्तल करते
क्षत्रिय होकर क्यों सहते हो तुम अत्याचार ॥२॥

क्षणिक काल का, है यह जनेऊ
सफलन होवे जीवन-हेतु
हरिनाम का पहन जनेऊ
शतजन्मों के सहज कटेंगे तेरे बंध हजार ॥३॥

–राधाकृष्ण गुप्ता "चेतन"
डोंबिवली (पूर्व)

# मी साईभक्त कसा झालो ?

लेखक, श्री. डी. बी. पोतनीस, पुणे.

मला असा प्रश्न नेहमीच कोणाकडून तरी विचारला जातो, आणि मी त्यांना मोठ्या अभिमानानें स्पष्टीकरण करीत असतो कीं, माझे 'शिर्डी' बाबा माझ्या गेली ३५ वर्षें पाठीशीं आहेत.

मी सन १९३८ मधें माझ्या एका मित्राबरोबर पुणे येथे सदशिव पेठेत श्री. फडके यांचे घरी श्रीसद्‌गुरु साईबाबांचे दर्शनासाठी गेलो होतो. वेळ संध्याकाळी सात साडेसातची होती. श्रीसाईबाबांचा एक मोठा फोटो होता. त्या फोटोला सुंदर सोनेरी चौकटीची फ्रेम असून त्यांवर नाना रंगाची, नाना तऱ्हेची फुलांची माळ चढविलेली होती. श्रीबाबांचे कपाळीं केशरी चंदन होते. अत्तराचा सुवास, उदबत्यांचा घमघमाट असा थाट होता. अशा या शुभ वातावरणांत श्रीबाबांच्या आरतीला सुरुवात झाली. सर्व भक्तजन आरती म्हणत होते. श्री. फडके यांचे हातातील आरतीचे तबक श्रीबाबांचे फोटोसमोर आरतीचे तालावर नाचत फिरत होते. आरती संपली आणि श्रीसाईभक्तांनी बाबांची गाणी, भजने म्हणावयास सुरवात केली. त्यांच्यात एक चुरसच लागली होती. हा सर्व कार्यक्रम रात्री साडे दहापर्यंत चालला होता. तीर्थ-प्रसाद झाला, श्रीबाबांची शेजारती झाली आणि भक्त मंडळी श्रीबाबांचा निरोप घेऊन घरोघरी गेली. मी व माझा मित्र श्री. देशमुख थोडा वेळ तेथेच थांबलो होतो. श्री. फडके यांचे बरोबर माझा मित्र श्रीसाईबाबांचे चमत्कार सांगत होता. चमत्कार ऐकून मला कौतुक वाटत होते. मी मित्राला म्हणालो कीं, 'देशमुख हे सर्व चमत्कार खरे आहेत काय ? तुमचे पदरचेच तर सांगत नाही ना ?' तेव्हा श्री. फडके मला म्हणाले, तुमचे नांव काय ? "पोतनीस"! 'मग हे पहा पोतनीस बाबांचे नुसते स्मरण केलेत, तरी सुद्धा ते तुमच्या समोर उभे राहतील. आतांच प्रयत्न करून पहा. झांका तुमचे डोळे आणि बाबांना साद घाला-दोन सेकंदात बाबा तुमचेसमोर उभे राहिलेले दिसतील. मी त्यांचे सांगण्याप्रमाणे डोळे झांकले त्याची मूर्ती डोळ्यासमोर यावी म्हणून प्रयत्न केला, परंतु मला कांहीच दिसले नाही. दोन मिनटे झाली, पांच झाली. अखेर मी डोळे उघडले. समोर कांहीच दिसत नाही, बाबाही नाहीत आणि समोर फोटोसुद्धा नाही. माझेसमोर सर्वच अंधार दिसला. थोड्या वेळाने श्री. फडके यांनी

मला पाणी पाजले मी सावध झालो, काय बोलावे तेंच समजेना. श्री. फडके यांनी उदी पाण्यांत टाकून पिण्यास दिली. उदीच्या पाण्याचा घोट घेतांच एखादा लहानसा इलेक्ट्रीकचा शॉक बसावा असा भास झाला. मी श्री. फडके यांचे पाय धरले आणि त्याच वेळेपासून मी श्रीसाईबाबांचे चरणतीर्थ दररोज घेऊं लागलो आहे. त्यांचेच कृपेने आज गुरुवार दिनांक २०-९-७३ पर्यंत तरी मला श्रीबाबांचे छायेखाली आनंद लुटता येत आहे.

मला आजपर्यंत श्रीसाईबाबांचे जे अनुभव आले आहेत ते श्रीसाईलीला अंका–मधून वेळोवेळी श्रीसाईभक्तांचे वाचनांत आलेले आहेतच. . . .जय साई !


॥ श्रीसाईप्रसन्न ॥

## ॥ अपूर्व साईकृपा ॥

**सर्व प्रकारच्या जुनाट रोगांवर खात्रीपूर्वक इलाज !**

जुनाट संधिवात उसण, शूळ, गॅस्ट्रिक आजार, दमा, ब्लडप्रेशर, अल्सर, स्त्रियांचे आजार, मधुमेह, व सर्व प्रकारचे लहान मुलांचे आजार, यांवर खात्रीपूर्वक इलाज केला जाईल. रुग्णांनी आपले वय, रोगाचे वर्णन, व किती वर्षे रोग आहे हें लिहिल्यास पोस्ट पार्सलने औषधे पाठविली जातील. रोगाप्रमाणे औषधाचे कोर्स करून रोग बरा केला जातो. घेण्यास सुलभ व गुणकारी औषधयोजना. अनुभव हीच खात्री. सर्वप्रकारच्या रुग्णांनी अवश्य फायदा घ्यावा.

पोस्टेजसह कोर्स किंमत एक महिना रु. ४०–३०, दोन महिने रु. ७५–६०, तीन महिने रु. १००–५०, मनीऑर्डर किंवा चेक स्वीकारले जातात. औषधाबरोबर तीं घेण्याची रीत व माहिती कळविली जाते. लिहा / भेटा :–संचालक, साई (सेवाश्रम) दवाखाना, साईसदन, कॅनरा बॅंकेमागें, शिवाजीउद्यान, शहापूर, बेळगांव.

# चंद्रभागेच्या तिरीं

चंद्रभागेच्या तिरीं सांडली संतचरणधूळ ती
त्या मातीला माथीं लेवुन पापी जन तरती ॥धृ०॥

पुंडलिकाच्या भव्य मंदिरीं
जमली सगळी संत मंडळी
मृदंग, वीणा, वाजे टाळी
विठुनामाची उधळण होतां गंधित हो माती ॥१॥

नदीकिनारी तालावरती
फेर धरुनिया संत नाचती
नामस्मरणीं तल्लीन होती
खडयाखडयाला वाचा फुटुनी नामीं हुंकारती ॥२॥

देवदर्शना दिंडि निघाली
विठुरायाच्या दारीं आली
प्रथम पायरी "नामे" केली
संत जनांचे पदसंवाहन मोक्षाची प्राप्ती ॥३॥

गरुड आणि हनुमंत उभयतां
द्वारपाल हे दारीं असतां
येतिल पापें कशी मागुतां ?
समोर दिसते विठुरायाची नयनरम्य मूर्ती
त्या मूर्तीला वंदन करितां पापीजन तरती ॥४॥

गुणवन्त तावरे
डोंबिवली (पश्चिम)

# नाशवंत देहावर

नाशवंत देहावर
करू नको प्रीति
राम राम राम नाम
घेई तूंच ओठीं ॥ धृ० ॥

माझे माझे आहे जवळ
तेचि सारे मृगजळ
करी निष्काम तू भक्ति ॥ १ ॥

संसार हा असार
नाम हेचि आहे सार
करी देवावर प्रीति ॥ २ ॥

मना तूंची करी संधान
योग क्षेम तूंच जाण
उद्धरील तुज जगजेठी ॥ ३ ॥

सौ. मालती जोशी ( डोंबिवली )

———:०:———

# मी साईभक्त कसा झालो ?

लेखक– श्री. अनिल पंडित, इंदूर

मला श्रीसाईबाबांचे नांव, गांव सन १९६१ च्या अगोदर माहित नव्हते. ह्या सनांतच माझ्या आते बाहिणीच्या यजमानांनी श्री साईबाबांची फोटोने व वर्णनानें ओळख करून दिली. ती मंडळी बाबांची भक्ती, पूजापाठ व आरती नित्य नेमानें काही वर्षे आधीपासूनच करीत होती. शिरडीला पण ह्या मंडळीची बऱ्याच वेळा वारी झाली होती. मला ह्या सर्व गोष्टी अगदी नव्या होत्या, व त्यातील काहींच माहित नव्हते. मी त्यांना म्हटले की, मला स्वत: प्रत्यक्ष प्रचीती आल्याशिवाय माझा कोणत्याहि देवावर सहसा विश्वास बसत नाही, परंतु बाबांच्या मनात काही औरच होते. बाबांनी दोरीने खेचून मला त्यांच्या चरणाशी आणून ठेविले आहे. व माझ्या जन्माचे सार्थक केले आहे. मी ६१ साली बी. एस. सी. भाग एकच्या परीक्षेला बसलो होतो. ही परीक्षा पास करणे म्हणजे खरोखरच अवघड काम होते. कारण ह्या परीक्षेचा रिझल्ट फार कठीण लागत होता. माझे एक दोन पेपर्स विशेष चांगले गेले नव्हते. आमच्या जिजाजींनी सांगितल्याप्रमाणे घरांत बाबांची एक फ्रेम केलेली तसवीर आणून देवघरांत लावली व बाबांची पूजा व आरती गुरुवारी करीत गेलो. मनांत मुख्य स्वार्थ पास होण्याचा होता, कारण चमत्काराशिवाय नमस्कार नाही. आणि खरोखर आश्चर्य म्हणजे मी चांगल्या वर्गात पास झालो. नंतर मी बी. एस. सी. भाग दोन व तीन चांगल्या डिव्हीजनने पास झालो. ह्या काळात मला प्रत्यक्ष बाबांनी स्वप्नात दोनतीनदां दर्शन दिले व मला प्रचीतीचा अनुभव दिला. एका स्वप्नात तर बाबा प्रत्यक्ष माझ्याशीं बोलले व दुसऱ्या एका स्वप्नात मला सर्व शिरडीचे दर्शन करविले, पण मी शिरडी पाहिली नसल्याने बाबांनी दाखविलेल्या गोष्टी बरोबर समजल्या नाहींत, पण मी ह्या काळात साईलीलामृत वाचीत असल्यानें थोडी कल्पना आलीं. साईलीलामृत वाचण्याची सुरुवात पण नकळत गुरुवारीच झाली.

अशाप्रमाणे बांबांच्या प्रचीतीवर प्रचीती येत गेल्यामुळें माझा बाबांवर विश्वास द्विगुणित होत गेला.

मी बी. एस. सी. असल्यामुळें बाबांच्या कृपेने मला सन १९६४ साली एका खाजगी शाळेत शिक्षकाची नोकरी मिळाली. ही माझी पहिलीच नोकरी. घरची परिस्थिती पण बदलत गेली. तीन चार वर्षेपर्यंत मला खूप टयूशन्स मिळाल्यामुळें माझी आर्थिक परिस्थिती पार बदलून गेली. पण शिक्षकाच्या व्यवसायात फार आनंद न वाटल्यानें बाबांना मी म्हटले की मला मेडिकल रिप्रेझेंटेटिवची नोकरी

मिळाली तर फारच चांगले होईल. आणि बाबांना विनंती करण्याचा अवकाश मला ६८ साली मुंबईच्या एका औषधी कंपनीमध्यें इन्दूर हेडक्वार्टर म्हणजे माझ्याच शहरात नोकरी लागली. एक वर्षपर्यंत काम केले, पण पगार कमी असल्यामुळे चांगल्या औषधी कंपनीत नोकरी मिळण्याच्या खटपटीत लागलो. आणि, बाबांनी जादूची कांडी फिरवल्याप्रमाणे जर्मन औषध कंपनीत मला चांगल्या पगाराची नोकरी मिळाली व त्याच कंपनीत मी हल्ली मेडिकल रिप्रझेंटेटिव आहे. बाबांच्या कृपेने सर्व व्यवस्थित चालले आहे. नंतर माझे लग्न १९६१ साली झाले. बायकोला मुलाची फार हौस. मुलगी नको होती. माझा बाबांवर पूर्ण विश्वास असल्यानें बाबांना मी म्हटले की बाबा तुमच्या कृपेने मुलगाच होऊ दे, व बायकोला म्हटले कीं तुला मुलगाच होईल हे तू लिहून ठेव. व तो पण गुरुवारी किंवा शुक्रवारीच होईल. नंतर मला माझेच वाटले की हे मी काय बोलून गेलो ! परंतु हे शब्द बाबांनी खोटे होऊं दिले नाहीत. आम्हाला मुलगाच झाला व तो पण शुक्रवारी. खरोखर बाबांची लीला अगाध आहे ना ! माझी दौऱ्याची नोकरी आहे पण बाहेरगावी पण मी जर गुरुवार असला तर बाबांची आरती करतो. हो पण बाबांचीच कृपा आहे की माझ्या नियमात कांही व्यत्यय येत नाही, व सर्व व्यवस्थित पार पडते. आयुष्यात इतक्या कमी काळात जास्तीतजास्त प्रचिती दाखवून बाबांनी माझ्यावर अनंतकोटि उपकार केले आहेत.


# साई भक्तांस सुवर्णसंधी

श्री साई बाबा संस्थान, शिरडी येथे भक्तांनी देणगी म्हणून दिलेल्या सोन्याच्या दागिन्य चा लिलाव **शनिवार दिनांक १५ डिसेंबर १९७३** ला दुपारी ३ वाजता **साई निकेतन, ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई ४०००१४** येथे होणार आहे. तरी सर्व साई भक्तांनो ह्या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा अशी त्यांस विनंती करण्यात येत आहे

# श्री साईबाबा संस्थान, शिरडीची प्रकाशनें

श्री साईबाबा संस्थान, शिरडी यांच्या प्रकाशनांच्या किमती कामाच्या
ोईकरतां दि. १५–११–७३ पासून पुढीलप्रमाणें ठरविण्यात आल्या आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | श्री साई सच्चरित (मराठी) | रु. | ८-०० |
| २. | श्री साई सच्चरित (इंग्रजी) | रु. | ५-०० |
| ३. | श्री साई सच्चरित (गुजराती) | रु. | ४-५० |
| ४. | श्री साई सच्चरित (हिंदी) | रु. | ४-२५ |
| ५. | श्री साई सच्चरित (कानडी) | रु. | ४-२५ |
| ६. | श्री साईबाबा जीवितचरित्रम् (तेलगू) | रु. | ८-०० |
| ७. | श्री साईनाथ स्तवनमंजिरी व सुमनांजलि (मराठी) | रु. | ०-२० |
| ८. | दासगणूकृत ४ अध्याय (मराठी) | रु. | ०-२५ |
| ९. | सगुणोपासना (मराठी किंवा गुजराती) | रु. | ०-२० |
| १०. | श्री. प्रधानकृत चरित्र (इंग्रजी) | रु. | १-०० |
| ११. | श्री साईलीलामृत (मराठी) | रु. | २-०० |
| १२. | सचित्र साईबाबा | रु. | १-०० |
| १३. | शीलधी (मराठी) | रु. | ०-२० |
| १४. | साईबाबा : अवतार व कार्य (अ. य. धोंड) | रु. | १-७५ |
| १५. | शिरडी दर्शन (६६ फोटोंचा आल्बम) | रु. | २-०० |
| १६. | श्री साईलीला मासिक (मराठी किंवा इंग्रजी) | | |
| | प्रत्येकी वार्षिक वर्गणी | रु. | ६-०० |
| | " किरकोळ अंकास – | रु. | ०-६० |
| १७. | मुलांचे साईबाबा (द. दि. परचुरे) (मराठी) | रु. | ०-५० |

*

**वरील प्रकाशनें मिळण्याची ठिकाणें :—**

१. व्यवस्थापक, श्रीसाईबाबा संस्थान, पोस्ट शिरडी, जिल्हा अहमदनगर.

२. मुंबई ऑफिस, साई निकेतन, ८०४-बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, पिन :– ४०००१४.

Regd. No. MH 52

Sai Baba Tutorial Academy's

**Inter Arts Classes**

( 1 9 4 3 )

Kshatriya Niwas, Portuguese Church, Girgaon,
Opp. Lakhani Book Depot, Bombay 4. Tel. 354337

*

**The only special Inter Arts Classes
in Bombay**

*

100 % Results last 20 consecutive years.

*

Logic, Economics, English, French, Etc.

*

Taught with exhaustive cyclostyled notes.

*

Probable questions with class-getting answers issued every year for the University Examination with 100 % accuracy.

*

Patronised by children of Ministers, Supreme Court, High Court, Small Cause Court Judges, Presidency Magistrates and eminent industrialists.

FRESH BATCHES :—
Starting from 3rd December 1973
HURRY UP ! LIMITED ADMISSIONS !

मुद्रक : **श्रीमती लक्ष्मीबाई नारायण चौधरी,** निर्णयसागर प्रेस,
४५-डीई, ऑफ टोकरसी जीवराज रोड, शिवडी, मुंबई–
संपादक व प्रकाशक : **श्री. का. सी. पाठक,** 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर र
खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई